मिलिंद कुलकर्णी

# भेटी लागी जीवा



# भेटी लागी जीवा

मिलींद सीताराम कुलकर्णी

ई साहित्य प्रतिष्ठान

भेटी लागी जीवा (कथासंग्रह)

लेखक : मिलींद सीताराम कुलकर्णी
House No. A-14, Shri Vasunhara Gurubaksh Green colony,
Opp. Jaycees Public School, Near Shri Krishna Hospital,
Gangapur Road, Rudrapur
Distt. Udham Singh Nagar. Uttarakhand.
Phone no. 08171030307,
Email: milindslkulkarni@rediffmail. com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

# प्रकाशक : ई साहित्य प्रतिष्ठान

www. esahity. com

esahity@gmail. com

प्रकाशन :४ डिसेंबर २०१६



©esahity Pratishthan®2016

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ईसाहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे - आवश्यकआहे.

## लेखक परिचय



मिलिंद सीताराम कुलकर्णी, जन्म तारीख : 25 मार्च 1972. शिक्षण: मेकॅनिकल इंजिनिअर. मूळ रहिवासी : कोल्हापूर. सध्याचा रहिवास: रुद्रपूर (उत्तराखंड) फेब्रुवारी-1911 पासून. प्राथमिक/माध्यमिक शिक्षण : मराठी माध्यम. मातृभाषा: कन्नड, जन्मस्थान: विजापूर (कर्नाटक).

सध्या पुण्यात हेड-ऑफिस असणाऱ्या एका इंजिनीरिंग मॅनुफॅक्चरिंग कंपनीच्या पंत-नगर (रुद्रपूर) उत्तराखंड येथे असणाऱ्या शाखेमध्ये शाखा प्रमुख. त्यापूर्वी, जयसिंगपूर, कोल्हापूर, बेळगाव, पुणे येथे नोकरीच्या निमित्ताने वास्तव्य.

*Milind Sitaram Kulkarni*
*House No. A-14, Shri Vasunhara Gurubaksh Green colony,*
*Opp. Jaycees Public School, Near Shri Krishna Hospital,*
*Gangapur Road, Rudrapur*
*Distt. Udham Singh Nagar. Uttarakhand.*
*Phone no. 08171030307,*
*Email: milindslkulkarni@rediffmail.com*

# मनोगत:

माझे पहिले पुस्तक 'काटा किर्रर्र' ला आपण सर्वांनी दिलेल्या प्रतिसादाबद्दल आपल्या सर्वांचे मनापासून आभार. सर्वांच्या प्रतिक्रिया, मनोगत आणि अभिप्राय या रूपाने मिळालेल्या अमुल्य देणगीतून दुसरे पुस्तक आपल्यासमोर सादर करताना मला अत्यंत आनंद होत आहे.

मी बऱ्याच वर्षापासुन थोडेफार लिहीत होतो, पण कधी ते प्रकाशित करण्याचा विचारच केला नव्हता. माझ्या पत्नीने ते लिखाण वाचले आणि तिला ते आवडले. तिच्यातल्या 'पत्नीत्वाने' मला ते लिखाण प्रकाशित करण्यासाठी माझ्या मागे एकंच टुमणं लावलं. मी बराच प्रयत्न आणि शोधाशोध  केल्यानंतर मला 'ई-साहित्य' वाले  सापडले, तसा मी त्यांचा 'ई-वाचक' होतोच.

अशातऱ्हेनें माझे पहिले पुस्तक प्रकाशित झाले, 'काटा किर्रर्र'.

आणि आता दुसरे पुस्तक प्रकाशित करतोय अर्थातच, आपल्या सर्वांच्या प्रोत्साहनामुळे.

कथा लिहून पूर्ण होताच ती प्रथम माझ्या पत्नीला म्हणजे लताला वाचून दाखवतो, आणि फुरसतीने ती पुन्हा एकदा वाचते आणि मला आपले अभिप्राय, सूचना कळवते. त्यानंतर मी माझे लिखाण कोल्हापूर मध्ये असणाऱ्या माझ्या मुलीला, प्रतिक्षाला पाठवतो ती त्यातले बारकावे, आणि प्रसंग याविषयी सखोल चर्चा करत आपला अभिप्राय मनापासून कळवते.

आणि, त्यानंतरचे बहुमोल कार्य करणारे ‘ई-साहित्य’ !

या सर्वांचा हातभार माझ्यासाठी खूपच महत्वपूर्ण वाटतो. त्याबद्दल त्यांचे शतशः आभार.

आणि अर्थातच आपणा सर्वांचा अभिप्रायही मला प्रोत्साहित करतो !!!

धन्यवाद,

मिलींद सीताराम कुलकर्णी.

# “अर्पणपत्रिका”

“म्हणतात ना आई-वडिलांना केलेला नमस्कार सर्व देवांना पोहोचतो,

तसेच त्यांना अर्पण केलेले पुस्तकही सर्वांना अर्पण होते,

म्हणून माझे हे पुस्तक माझ्या आई-बाबांना कृतज्ञपणे  समर्पित !!!”

# कथा अनुक्रम

हृदयीं प्रीत जागते

अखेरचे येतील माझ्या

तेथे तुझी मी वाट पहाते---१

तेथे तुझी मी वाट पहाते (उत्तरार्ध)

जीव गुंतला

यातील सर्व कथा काल्पनिक असून त्यांचा कोणत्याही जीवित वा मृत व्यक्ती, स्थळ वा घटनांशी संबंध नाही. या कथा निखळ मनोरंजनासाठी आणि काही सामाजिक संदेश देण्यासाठी असून त्यातून कोणतीही अंधश्रद्धा वा भिती पसरवण्याचा लेखक वा प्रकाशक यांचा हेतू नाही.

# <u>हृदयी प्रीत जागते, - - - जाणता अजाणता !!!</u>

"**साहेब,** रात्रीचा एक वाजून गेल्यामुळे हॉटेल बंद करणार आहोत", असे वेटरसोबत आलेल्या हॉटेल मालकाने सांगताच त्यांच्या दंगामस्तीत खंड पडला आणि सगळेजण भानावर आले. बघतात तर खरोखरच रात्रीचा एक वाजून गेला होता, आणि त्यांच्या शिवाय हॉटेल मध्ये कोणीच नव्हते. गेले सहा-सात तासाचा वेळ कसा गेला आणि किती वेळ एन्जॉय करत होतो कुणालाच कळले नाही. 'शहरापासून लांब असणाऱ्या हॉटेलचे एक चांगले असते रात्री बराच वेळ एन्जॉय करता येते नाहीतर शहरात, दहा-साडेदहा वाजता बंद करू लागतात.' आणि हा विचार करूनच आज ते सहा-सात मित्र रोजच्या प्रमाणे शहरातल्या हॉटेल मध्ये न जाता वीस-पंचवीस किलोमीटर लांब असणाऱ्या हॉटेलात आले होते. त्यांच्यातच तो पण होता, त्यांच्या कार मध्ये जागा नसल्यामुळे स्वत:ची स्कूटर घेवून आला होता.

एकमेकाला सावरत सगळेजण उठले, हॉटेल बाहेरच्या सुनसान आवारात आले आणि कारमध्ये जावून बसले. आणि त्याला 'बाय, सी यु टुमारो ! भेटू उद्या, नेहमीच्या ठिकाणी.' असे म्हणत निघून गेले. तो एकटाच उरला.

हॉटेलवाल्यांनी सगळे लाईट्स बंद केले. आणि ते लोक झोपायला कुठेतरी निघून गेले.

तो पण अडखळत आपल्या स्कूटर जवळ गेला, दाट अंधारात अंदाजानेच स्कूटर चालू केली, गिअर टाकला तर स्कूटर पुढेच जाईना. जोरात रेस केली तरी स्कूटर पुढे जात नव्हती म्हणून घाबरून घामेघूम झाला आणि बसूनच मागे पाहू लागला, तर स्कूटर बंद पडली. आजूबाजूला किट्ट काळोख. बहुधा अमावास्या असावी. लांब रस्त्यावर एक पिवळट लाईट बाजूच्या पर्णहीन झाडाला अधिकच भेदक करत होता. स्कूटरचं काय करावं म्हणून उतरून मागे पहातो तर त्यांच्यातलाच एक मित्र त्याच्या स्कूटरला धरून मागे ओढत, हसत होता.

त्याने रागाने मित्राला, "अरे, तू गेला नाहीस त्यांच्यासोबत? मी समजलो तू पण गेला असशील, मग इथे काय करतोस?"

"अरे होय, मी बाहेर येताना फ्रेश व्हायला गेलो होतो ना, तेंव्हा तुझ्यासोबत येण्यास सांगून सगळे निघून गेले." तो मित्र.

"बरं झालं, येताना एकटाच आलो तेंव्हा कंटाळा आला होता, आता तेवढीच तुझी सोबत. म्हणजे रस्ता लवकर संपेल, चल निघूया,." असे म्हणत घामेघूम झालेला चेहरा थंड पाण्याने धुवून, 'साल्याने सगळी नशाच उतरवली.' असे पुटपुटत त्याने स्कूटर चालू केली आणि दोघेही निघाले.

"तुला माहिताय, संध्याकाळी पाच वीसला अमावस्या सुरु झालीय? आणि त्या टेकडी जवळच्या झाडीत स्मशान पण आहेना, म्हणून जाताना तुला सोबत म्हणून थांबलो खरे तर." तो मित्र.

'मला माहित नव्हते अमावस्या असल्याचे, आत्ता आठवण करून द्यायची काय गरज होती या साल्याला, च्यायला उरली-सुरली नशा पण उतरली.' असे मनातल्या मनात म्हणत, त्याला काहीच उत्तर न देता तो स्कूटर जोरात पळवू लागला.

"आज हडळ आणि भूतांचा नाच सुरु असेल नाही त्या स्मशानात?"-तो मित्र.

'अरे ह्याच्या आयला, गप्प बसायचे सोडून असा काय बडबडायला लागलाय हा?' असे विचार करत तो म्हणाला,"तू चालवतोस स्कूटर? मी बसतो मागे."

"नको नको तूच चालव मला कुठे येते स्कूटर चालवायला, घाबरलास की काय तू, माझ्या बोलण्याने? अरे गम्मत केली रे मी तुझी." - हसत हसत तो मित्र.

काहीच न बोलता तो स्कूटर चालवत राहिला, स्मशानाजवळचा झाडीतला तो दोनतीन किलोमीटरचा भाग सुरु झाला. आणि; ... मागचा मित्र इतका वेळ गप्प का या विचाराने तो आतून जरासा हलला. पण तेवढ्यात आवाज आला.

"एक सांग दोस्ता, या रस्त्यावर आता एक माणूस दिसला तर आपल्याला काही वाटणार नाही पण जर एखादी बाई फिरताना दिसली तर पुंगीच वाजेल नाही आपली?” इतका वेळ तोंड मिटून गप्प बसलेला तो मित्र पुन्हा बोलला.

"तुला काही डोक्याचा भाग आहे का?, अक्कल आहे का? अरे आपण कुठून चाललोय, आज रात्र कसली आहे, आणि तू काय बडबडतोस, कळतंय का तुला?"- तो भडकून.

त्याची आणखी गम्मत करण्यासाठी तो मित्र, "हे गेले बघ स्मशानाचे मेन गेट, आता इथे बाई किंवा बुवा काहीही दिसायचे तर राहूदे, एखाद्या रडणाऱ्या बाळाचा आवाज आला तर?"

त्या मित्राचे बोलणे संपते न संपते तोच, त्याने वेगात असलेल्या स्कूटरचा कच्चकन ब्रेक दाबला, स्कूटर रस्त्यावर घासत, ओढत रस्त्याच्या एका बाजूला गेली, बाजूच्या झाडीत घुसणार, पडणार; इतक्यात त्याने कशीबशी सावरली, आणि थांबवली. मागून त्याच्यावर जोरात धडकलेला मित्र स्कूटर वरून उतरत घाबरून म्हणाला," काय झाले?"

तो रागाने, "नुसता बडबडत होतास, बोम्बलत होतास, समोर लक्ष होतं का? तीनचार कुत्री समोर आली होती अचानक, पळून गेली. स्कूटरखालीच आली असती. पडलो असतो दोघेपण."

सोबत आणलेल्या बाटलीतल्या पाण्याने दोघांनी तोंड धुतले, आणि तो स्कूटर सुरु करणार एवढ्यात,

एवढ्यात, बाळ रडत असल्याचा आवाज आला !

खरंच त्या झाडीतून, बाळ रडत असल्याचा आवाज आला !!!

दोघेही चमकून एकमेकाकडे बघू लागले, थांबून थांबून पुन्हा बाळाच्या रडण्याचा आवाज येत होता. आता मात्र खरोखरच दोघांची पुंगी वाजली.

तो मित्र, "चल यार, स्कूटर सुरु कर लवकर, निघू इथून, काहीतरी गडबड आहे."

त्याने शांतपणे स्कूटर बाजूला लावली आणि त्याच्या बोलण्याकडे लक्ष न देता आवाजाच्या दिशेने जावू लागला. आतापर्यंत त्याला घाबरवणारा, पण आता स्वत: भयंकर घाबरलेला मित्र, "चल यार, कशाला नसत्या लफड्यात अडकतोस?"

काहीही न-बोलता तो त्या आवाजाच्या दिशेने जावू लागला, झपाटल्यासारखा!! नाईलाजास्तव त्याचा मित्रपण घाबरत घाबरत त्याच्या मागोमाग गेला.

काही अंतर झाडीतून चालत पुढे गेल्यावर एका झाडाच्या मागे, कपड्यात गुंडाळलेले बाळ त्यांना दिसले ! काही कुत्री बाळाला लपेटलेले कापड ओढायचा प्रयत्न करत होती आणि एक कुत्रे गुरगुरत त्या कुत्र्यांना चावून लांब पळवत, मधेच त्या बाळाला चाटत होते. अंधारामुळे नीट काही दिसत नसल्यामुळे, त्याने पळत जावून स्कूटर सुरु करून त्याचा लाईट लावला आणि त्या पालापाचोळयातून बाळाच्या दिशेने आणली. प्रकाश पडताच ती सगळी कुत्री पळून गेली. त्याने स्कूटर थांबवून त्या बाळाला उचलले, रुमालाने त्याचे तोंड, अंग स्वच्छ पुसले, ते बाळ रडायचे थांबले. स्कूटरचे कापडी सीटकव्हर काढून त्यात त्या बाळाला गुंडाळून, पायाजवळच्या जागेत झोपवले. आणि इतक्या वेळ स्तब्धपणे बघणाऱ्या, घाबरलेल्या मित्राला मागे बसवून तो विचार करत निघाला, 'सांभाळायला येत नसेल तर जन्माला का घालतात यांचे आईबाप, काय माहित?'

शहराजवळ, त्याच रस्त्यावर असणाऱ्या अनाथ-आश्रमाजवळ आल्याचे त्याच्या लक्षात आले. आश्रमाचा वाचमन गार्डरूम शेजारी असणाऱ्या बाकावर गाढ झोपलेला पाहून त्याच्या नकळत बाळाला गार्डरूम मध्ये ठेवले. आणि त्या गोड बाळाची एक पप्पी घेवून तो तिथून आपल्या मित्रासोबत आपल्या घरी निघाला. भुताचे नाव घेतले तरी घाबरणारा, एवढे मोट्ठे धाडस कसे करू शकला हे त्याचे त्यालाच कळत नव्हते. विचार करत करत मित्राला घरी सोडून तो आपल्या घरी पोहोचला, हातपाय धुवून फ्रेश झाला आणि अंथरुणावर पडला. रात्र संपून, पहाट संपायची वेळ झाली होती, पण त्याला झोप लागत नव्हती, तरीही तोच विचार त्याच्या डोक्यात सारखा सारखा येत होता,

'सांभाळायला येत नसेल तर जन्माला का घालतात यांचे आईबाप, काय माहित?'

'अशी काय परिस्थिती आली असेल कि त्या चिमुकल्या बाळाला इतक्या क्रूर पद्धतीने रात्रीच्या एकांतात सोडून गेले असतील. ज्यांनी जन्म दिला त्यांची सांभाळायची परिस्थिती नसेल कि काय? कि आणखी काही भानगड असेल. आम्ही वेळीच तिथे पोहोचलो नसतो तर काय झाले असते?' असे नाना विचार त्याच्या डोक्यात येत होते. ' खरंच नसते एखाद्याची सांभाळायची परिस्थिती, पण ज्यांच्याकडे सांभाळायची परिस्थिती असते त्यांना हे सुख मिळत नाही. मी पण तसाच आहे जी काही थोडीफार कमाई करतोय ती पण सगळी चैनी करण्यात घालवतोय. मला पण एखादे बाळ असते मी त्याला किती सुखात ठेवलो असतो. पण माझी परिस्थिती वेगळीच आहे. चैनीत, दारूत पैसे बरबाद करतोय, ते पैसे अशा गरिबांसाठी दिले तर त्यांचे किती कल्याण होईल.' असा विचार करत त्याला कधी झोप लागली ते कळलेच नाही.

त्या बाळाच्या रडण्याच्या आवाजाने खडबडून जागा झाला आणि पाहतो तर तो भास होता, आणि दुपारचे दोन वाजून गेले होते. कडकडून भूक लागली होती, म्हणून डबे शोधले तर त्यात काही बिस्किटं मिळाली; ती खावून पुन्हा आडवा झाला. डोळ्यासमोर त्या बाळाचाच चेहरा, पुन्हा तोच विचार, आणि विचार करता-करता पुन्हा झोपला. सहा वाजता उठला, आवरण्यासाठी आरशासमोर उभा राहिला तर आरशात बाळाचा चेहरा दिसू लागला. कसाबसा आवरून नेहमीप्रमाणे मित्रांच्या टोळक्यात गेला. सगळे मिळून पुन्हा बारमध्ये गेले, पण जवळच्याच. सगळ्यांच्या सोबत त्याने आपलीपण ऑर्डर दिली, वेटरने टेबल मांडले आणि ऑर्डर प्रमाणे सर्व काही आणून ठेवले. तोंडाला लावण्यासाठी हातात उचललेल्या ग्लासात त्याला त्या बाळाचाच चेहरा दिसू लागला आणि त्याच्या रडण्याचा घुमू लागला. स्वतःच्या नकळत ग्लास बाजूच्याच डस्टबिन मध्ये ओतून मोकळा केला आणि मित्रांची माफी मागून तो तिथून निघाला

पुन्हा न येण्याचा संकल्प करून - - - - !!!.

*******

शहरातला मोडकळीस आलेला व्यवसाय बंद करून, स्वतःचे असणारे छोटेसे घर सोडून दूरच्या एका शहरात नोकरी करू लागला. त्या रात्री घडलेल्या प्रसंगामुळे आणि हातून घडलेल्या चांगल्या कामामुळे, पूर्वी केलेल्या वाईट कामांचा पश्चाताप झाला. सवयी बदलल्या, त्यामुळे मित्र पण बदलले. बघता-बघता दोन वर्षे निघून गेली. चांगल्या मार्गाला लागून, भरपूर कष्ट करून बऱ्यापैकी पैसे जमा झाले. एक वेगळेच व्यक्तिमत्त्व तयार झाले. एकटेपणाचा कंटाळा येवू लागला. पूर्वी भांडून-सोडून गेलेल्या पत्नीची माफी मागून, बदललेली परिस्थिती सांगण्यासाठी; तिला भेटण्याचा आणि जुनी नाती पुन्हा जोडण्याचा बेत आखला. त्याच विचाराने तिला भेटण्यापूर्वी दुपारी आपल्या स्वतःच्या छोट्याशा घरी गेला, तर पत्नीने त्या पत्त्यावर पाठवलेली घटस्फोटाची नोटीस त्याच्या हाती लागली.

नोटीस बघताच सुन्न झालेला तो, थरथरत्या हातात नोटीस धरून शांत आणि थंड डोक्याने वाचू लागला. त्यात तिने त्याच्यावर केलेले गंभीर आरोप मनावर खोलवर परिणाम करत होते. आणि खोलवर परिणाम करत असले तरी ते खरे होते याची जाणीव त्याला होत होती. तिने केलेले एकेक आरोप वाचता वाचता त्याला पूर्वीचे दिवस आठवू लागले.

*****

स्वतःच्या घरच्यांचा विरोध पत्करून दोघांनी लग्न केले आणि दोघांचेही घर सुटले. बऱ्यापैकी पगाराची नोकरी असल्याने दोघांनीही वेगळा संसार थाटला. त्याने बऱ्यापैकी पैसे जमवल्यामुळे एक छोटेसे; पण स्वतःचे घर घेतले. दोन वर्षे अशीच आनंदात निघून गेली, मित्रांच्या सांगण्यावरून त्याने नोकरी सोडून स्वतःचा व्यवसाय सुरू केला. व्यवसाय म्हटलं की नफा-तोटा असणारच, या दोन्ही गोष्टींची तिला जाणीव होती. आणि म्हणूनच त्याचा विरोध

पत्करून ती एका शाळेत शिक्षकाची नोकरी करू लागली. त्याचा व्यवसाय चांगला चालला असल्याने त्याने कधी तिचा पगार सुद्धा विचारला नाही.

काही दिवसांनी व्यवसायात मंदी आली आणि लोकांची देणी वाढली. त्याला घर चालवणे मुश्किल झाले, पण तिच्या नोकरीमुळे घर चालू लागले. तरीही आपण नको म्हणून सुद्धा नोकरी करणाऱ्या बायकोचा त्याला राग येऊ लागला. घरापासून लांब राहून, रात्री-अपरात्री घरी परतू लागला. तिने विचारले तर तिचा राग येऊन, ऑफिसात बसत असल्याचे म्हणाला. एक दिवस नशेत असणाऱ्या त्याला; त्याच अवस्थेत असणाऱ्या त्याच्या काही मित्रांनी घरी आणलेले पाहून तिला खूपच वाईट वाटले. तिने त्याला समजावण्याचा प्रयत्न केल्यावर तिलाच तो ओरडू-मारू लागला, आणि हे नेहमीचेच होऊन गेले. ती सारेकाही निमूटपणे सहन करत होती, फक्त त्याच्या वरच्या प्रेमापोटी.

आजपर्यंन्त कधीही त्याने तिचा पगार विचारला नव्हता, पण त्याने तिला विचारले. त्याला स्वतःचे पैसे पुरेनासे झाल्याने, तिच्याकडून पैसे मागून आपल्या मित्रांसोबत चैनी करू लागला. तिचा पगार झाल्यानंतर काही दिवस तो मजेत असायचा आणि ती पैसे देणे बंद केल्यावर तो तिच्याशी भांडून तिला मारायचा. तरीही ती सहन करत होती तो आज ना उद्या सुधारेल या आशेवर.

आज ती त्याची वाट बघत होती, त्याला ती गोड बातमी सांगण्यासाठी. तिला आशा होती, नव्हे त्याच्यावर पूर्ण विश्वास होता; ती बातमी ऐकून तो पूर्णपणे सुधारणार आणि लागलेल्या वाईट सवयी सोडणार म्हणून. आज तिचा पगार झाल्यामुळे तो नक्कीच लवकर घरी येणार म्हणून तिला माहीत होते. म्हणून त्या गोड बातमीसोबतच त्याला न-सांगताच पगारातून साठवलेले सगळे पैसे त्याच्या व्यवसायाच्या नव्या उभारणीसाठी देण्याचा निर्णय घेऊनच ती त्याची वाट बघत बसली होती. आणि इकडे त्याचे मन वेगळयाच शंकेने जळत होते, त्याला आजच कळलेल्या गोष्टीचा बदला घेण्यासाठी रागाने तो घरी आला.

"आज मी तुम्हाला एक गोड बातमी सांगणार आहे." तो धाडकन दरवाजा ढकलून आत येताच त्याला हसत म्हणाली.

आज पूर्णपणे शुद्धीवर असलेला तो, "तुझी गोड बातमी गेली चुलीत. मला तुझ्याशी महत्त्वाचे बोलायचे आहे." असे म्हणत तिला मारू लागला आणि तिचे केस पकडून तिला खुर्चीवर बसवत म्हणाला.

हे सर्व नेहमीचेच भोग झाल्यामुळे, ती त्याला समजावण्याचा प्रयत्न करू लागली, पण तो स्वतःच बोलू लागला," आज मी येत असताना ती शेजारी भाड्याने राहणारी, आत्ताच लग्न झालेली मुलगी मार्केटमधून येत होती, माझ्या सोबत स्कुटरवर आली. तिने मला बोलता बोलता तुझा पगार सांगितला. तो तू मला सांगितल्यापेक्षा दुप्पट आहे. तू माझ्याशी खोटे बोलतेस असेपण ती म्हणाली. म्हणजे तू मला सांगितलेला पगार अर्धाच आहे, तू खोटा पगार मला सांगतेस. माझ्याशी गद्दारी करतेस? खोटे बोलतेस?" असे म्हणत तो तिला पुन्हा मारू लागला.

'मी काय ठरवून असं याला सांगितलेलं आणि काय घडले?' असे विचार करत ती त्याचा मार सहन करत होती, आणि तो तिला शिव्या घालत मारत होता.

झाला प्रकार असह्य झाल्याने त्याचे मारणारे हात घट्ट पकडून ती म्हणाली," हो बोलले खोटे, आधीच खरं बोलले असते तर तुमच्याकडून केंव्हाच हे पैसे उडाले असते, चैनी करण्यात. तुमच्या व्यवसायासाठीच जमवून ठेवले होते. हे घ्या, पैसे." असे म्हणून त्याच्या तोंडावर ते पैसे फेकले आणि आतल्या खोलीत जाऊन बसली.

" थापाडी, निघून जा तू या घरातून." असे म्हणत तो, ते पैसे गोळा करू लागला.

काही वेळातच सगळं वातावरण शांत शांत झालं.

'हा असाच मारत राहिला तर होणाऱ्या बाळाचं कसं होणार?, आता इथून गेलेलंच बरं.' अशा विचाराने ती बाहेर आली. बघते तर बाहेरच्या खोलीत तो नव्हताच, सगळे पैसे घेऊन गेला होता.

रात्री दहा-साडेदहा वाजता तो नशेतच घरी आला, बघतो तर दाराला बाहेरून कडी होती. दार उघडून तिला आवाज दिला, काहीच प्रत्युत्तर आले नाही. घरात-घराबाहेर सगळीकडे शोधू लागला कुठेच सापडेना. शेजारच्यांना विचारले तर त्या नव-विवाहित मुलीने

दरवाजा न-उघडताच, ती घर सोडून गेल्याचे सांगितले. आणि तो तिच्यावरच्या रागाने घरी येऊन झोपला.

******

त्या दिवशी जंगलात घडलेल्या घटनेनंतर तिला भेटून माफी मागायची खूप इच्छा होती. पण त्याने निर्धार केला पुन्हा तिच्या आयुष्यात जायचे तर वेगळे व्यक्तिमत्त्व घेऊन जायचे. आणि याच विचाराने आज तिला भेटायला निघाला होता, पण ती नोटीस मिळाली. डोळ्यातले अश्रू पडून भिजलेली ती नोटीस घडी करून बाजूला ठेवली आणि विचार करत पडून राहिला, आणि कधी झोप लागली त्यालाच कळले नाही.

काही वर्षांपूर्वी ज्या बाळाच्या रडण्याच्या आवाजामुळे त्याच्यात हा बदल घडला होता, अगदी तसाच रडण्याचा आवाज त्याला आल्याने तो खडबडून जागा झाला. बघतो तर पहाट झाली होती म्हणून तसाच पडून राहिला होता, तर डोळ्यासमोर ती नोटीस दिसत होती. 'ती तिच्या आई-वडिलांच्या घरीच असेल का? ती आपल्याशी बोलेल का ? पुन्हा आपल्याशी संसार करेल का? तिला भेटावे का नाही ?' असे अनेक विचार करत तो पडून होता.

जे काही होईल ते स्वीकारायचे, पण तिला भेटायचेच, असे मनात ठरवून तो उठला, आणि आवरू लागला. सकाळी आठ-वाजताच तो स्कुटरवरून तिच्या घरासमोर पोहोचला.

तिची आई पोर्चमध्ये चहा पीत बसली होती. तो हात जोडून नमस्कार करत त्यांच्या समोर गेला. त्याला बघताच त्या पटकन उभ्या राहिल्या, आणि आत येण्यास सांगून आत गेल्या. तो आत जाऊन सोफ्यावर बसला. इतक्यात ती पण आली आणि आपल्या आईशेजारी बसली. कुणी आणि कशी बोलायला सुरुवात करायची कुणालाच कळत नव्हते. तो इकडे तिकडे बघत असतानाच त्याचे लक्ष तिच्या बाबांच्या हार घातलेल्या फोटोकडे गेले. तो एकदम उठला आणि तिच्या आईच्या पाया पडून माफी मागून रडू लागला. थरारून त्याला उठवत त्यांनी दोन

वर्षांपूर्वीच तिचे वडील गेल्याचे सांगितले. वडिलांच्या इच्छेनुसार, पाठवलेल्या नोटिशीला उत्तर देऊन मुलीला दुसरे लग्न करण्यासाठी, बंधनातून मुक्त करण्याची विनंती केली.

परंतु पुन्हा असे न-वागण्याची हमी देऊन, पुन्हा एकत्र येण्यासाठी त्याने परवानगी मागितली. आपल्या आईच्या बाजूला बसलेली ती काहीच बोलत नव्हती, शांतपणे शून्यात बघत बसली होती. तिची माफी मागून; गेलेले दिवस विसरून पुन्हा सोबत राहण्याची तिला विनंती केली.

दोघींचाही काहीच प्रतिसाद न-मिळाल्यामुळे, अश्रू भरलेल्या डोळयांनी त्याने खिशातून नोटीस काढून सही करून समोरच्या टेबलावर ठेवली. जंगलात घडलेल्या प्रसंगापासून आपल्यात घडलेला बदल आणि गेल्या दोन वर्षांपासून करत असलेल्या कामाविषयी सविस्तर सांगितले. आणि तिला जबरदस्ती न-करता पूर्णपणे विचार करून निर्णय घेण्यास सांगून, दोघींची पुन्हा एकदा माफी मागून काही वेळाने तो परत गेला.

चार-पाच दिवस वाट बघून, सगळेकाही संपल्याची खंत मनात ठेवून निराशपणे तो आपल्या कामाच्या ठिकाणी जायला निघाला होता, एवढ्यात त्याच्यासमोर एक रिक्षा येऊन थांबली, त्यातून ती उतरली, उतरून त्याच्या-समोर ती नोटीस फाडून; तिने त्याचा हात धरला, प्रेमाने आणि विश्वासाने ! पुन्हा न-सोडण्यासाठी !

तो आणि ती तिच्या आईसोबत, आपल्याच छोट्याशा घरात राहू लागले. तो आपल्या कामाच्या ठिकाणाहून आठवड्यातून एकदा येऊ लागला. ती त्याला त्यादिवशी सांगणार असलेली गोड बातमी आता सांगितली, पण दुर्दैवाने ते बाळ जन्मताच गेल्याचे पण सांगितले. आणि हे कळल्यावर खूपच वाईट वाटले. त्यावेळी झालेल्या त्रासामुळे तिला पुन्हा बाळ होणार नसल्याचे डॉक्टरांनी सांगितल्यानंतर, बसलेल्या धक्क्यातून ती सावरलीच नव्हती.

तिच्यासाठी काहीतरी करायचेच असा विचार करत असतानाच त्याला पुन्हा आठवले,

'ज्याला बाळ पाहिजे असते त्याला मिळत नाही, आणि ज्याला परिस्थिती नसते त्यांच्या नशिबी बाळ असते, ते बाळांना सोडून देतात; जसे त्या जंगलात पाहिले होते तसे.'

तिला त्या घटनेतून सारण्यासाठी अनाथायलयातून बाळ दत्तक घ्यायचा मानस त्याने तिला बोलून दाखवला. तिला पण तो आवडला, आणि एक दिवस तो तिला एका अनाथालयात घेऊन गेला.

कुणी सोडलेली, कुणी टाकलेली, काही अपघातात पोरकी झालेली अशी बरीच दुर्दैवी मुले तेथे खेळात दंग होती. ते दोघेही लांबूनच त्यांच्याकडे बघत होते., त्या मुलांच्या न-कळत. त्या मुलांच्यातलीच एक मुलगी दत्तक घ्यायचे त्यांनी ठरवले. कारण त्यांचे ते जन्मताच गेलेले बाळ मुलगीच होती; असे तिचे बाबा तिला म्हणाले होते. दत्तक घेणाऱ्या बाळाशी पूर्णपणे ओळख होण्यासाठी तेथील नियमानुसार ती रोजच तेथे जाऊ लागली, तो सुटीच्या दिवशी. काही दिवसातच दोन-अडीच वर्षाच्या त्याच्यासारखेच घारे डोळे असणाऱ्या मुलीचा तिला खूपच लळा लागला, त्याला पण.

तीन-चार महिन्यांनी तो दिवस उजाडला, त्या परीला आपल्या घरी घेऊन यायचा. दहा-दिवसांची सुटी घेऊन कालच आला होता आणि सकाळी लवकरच खेळण्यांनी आणि फुलांनी घर सजवून दोघेही स्कुटरवरून तिथे गेले, त्या अनाथालयात; छोट्या परीला आणण्यासाठी !

अनाथालयाचे कायदेशीर सोपस्कर पूर्ण करून तिथल्या सर्व मुलांना बिस्किटे, चॉकलेट्स देऊन; त्यांनी परीला आपल्या सोबत घेतले. तिला नवीन छान कपडे घालून, भरपूर खाऊ आणि खेळणी देऊन आपल्या घरी घेऊन निघाले. त्या अनाथालयातून !

नव्हे त्या अनाथाश्रमातून. जिथे त्याने दोन वर्षांपूर्वी एका बाळाला त्याचा जीव वाचवून; त्या अमावस्येच्या रात्री त्या जंगलातून गुपचूप आणून सोडले होते !!!

जणू त्याच पुण्याईचे फळ असेल हे. असा विचार करत तो चालला होता.

आणि ती परी; त्यांच्यासोबत स्कुटरवरून चालली होती, त्याच स्कुटरवरून; ज्यावरून कुणीतरी तिचा जीव वाचवून त्या अमावस्येच्या रात्री, त्या जंगलातून गुपचूप इथे आणून सोडले होते !!!

'आज बाबा असते तर किती खुश झाले असते, त्या परीला बघून, अगदी त्याच्या सारखे घरे डोळे असणारी.' असा विचार करत ती आनंदाने परीला घेऊन ती मागे बसली होती. घरी जाताच तिच्या आईने रेडिओत लावलेल्या गाण्याचे सूर दोघांच्याही कानावर आले,

" हृदयि प्रीत जगते - - - - - जाणता – अजाणता !!! "

*****

पण - - - ,

पण यातले खरे रहस्य कुणालाच माहित नव्हते, जे रहस्यच बनून राहिले होते !!!

तिच्या बाबांनी, तिला झालेले बाळ जन्मताच गेल्याचे सर्वांना सांगितले होते. आणि दवाखान्यातल्याच कुणालातरी त्या बाळाला कुठेतरी दूर न्यायला सांगितले होते. तिच्याच भल्यासाठी, तिचे दुसरे लग्न करण्याच्या विचाराने. आणि नेणाऱ्याने, त्या रात्री त्या नुकत्याच जन्मलेल्या बाळाला त्या स्मशानाजवळच्याच जंगलात नेवून सोडले होते !

म्हणून, म्हणतात तेच खरे आहे

***"हृदयी प्रीत जागते - - - - -***

***----जाणता – अजाणता !!!"***

होय ना - - - ???

§§§§§§

# अखेरचे येतील माझ्या !!!

**रा**त्री अकरा बारा वाजताची वेळ. माझ्या पेक्षा दोन वर्षांनी लहान असणारा भाऊ एका बाजूला एकटाच शांतपणे थांबला होता. माझी मानलेली, नव्हे मानायला भाग पडलेली दोन मुले माझ्या देहाच्या बाजूला थांबली होती. आणखीही दोनतीन मंडळी आजूबाजूला थांबली होती. त्या भयाण शांततेत माझ्या त्या पाठच्या भावाशिवाय कोणाच्याही चेहऱ्यावर दु:ख जाणवत नव्हते. आजूबाजूला दोन चिता जळत होत्या. तेथे त्यांच्या आसपास जमलेली गर्दी जसजशी कमी होवू लागली तशी वातावरणातली भयानकता आणखीनच वाढू लागली. पण इथून पुढे मला अशा भयानक वातावरणाचीच सवय करून घ्यावी लागणार होती. बराच वेळ वाट पाहिल्यानंतर, आणखी कोणीही येण्याची शक्यता नसल्याने माझ्या देहाच्या अंत्यविधीला सुरुवात झाली. मानलेल्या मुलापैकीच एकाने सारे सोपस्कार पूर्ण केले, आणि माझा नश्वर देह त्या धगधगत्या अग्नीत जळू लागला. सर्वजण शांतपणे एकेकटे आपापल्या घरी जावू लागले. अशा तऱ्हेने सर्वांच्या तिरस्काराने भरलेल्या माझ्या मानवी शरीरातल्या जीवनाचा पूर्णविराम झाला होता.

ज्यावेळी मानवी शरीर धारण केले होते तेंव्हा कुठेतरी ऐकले होते कि शरीर नश्वर असते आणि आत्मा चिरंतन असतो. आज मला जाणवत होते कि माझ्या शरीराप्रमाणे माझा आत्मा देखील नश्वर असता तर ते माझ्या दृष्टीने वरदानच झाले असते. पण सृष्टीच्या निर्मात्याने जे घडवून ठेवलंय ते थोडंच बदलेल, ते सुद्धा माझ्या सारख्या तिरस्कृत जीवासाठी; शक्यच नाही.

माझ्या बासष्ट वर्षाच्या आयुष्यात मी खरंच इतका तिरस्कृत होतो का?, की माझे मरण सुद्धा माझ्यावरील त्या तिरस्काराला धुवू शकत नव्हते, की नातीच इतकी बोथट झाली होती ???

*****

सुसंस्कृत आणि उच्च कुळात वाढलेल्या आम्हा चौघा भावंडाना आमचे बालपण कसे गेले कळलेच नाही. आम्हा तीन भावात मी मधला आणि सर्वात लहान एक बहिण असे आम्ही चौघेजण. शिक्षक असलेले आमचे वडील म्हणजे अप्पा फारच शिस्तप्रिय होते, त्यांचेच गुण माझ्या मोठ्या भावाकडे म्हणजे भाऊ कडे आले होते. लहानपणी भाऊ आम्हाला तिघांनाही खूपच सांभाळायचा, त्यामुळे आम्हाला पण त्याचा खूपच आदर असायचा. आमच्या मनात त्याच्याविषयी आदरयुक्त भीती असायची. भाऊ एका बँकेत नोकरीला लागल्यानंतर दोनेक वर्षात माझेही कॉलेज पूर्ण झाले. चांगले मार्क्स मिळवून पास झाल्यानंतर बराच प्रयत्न करून सुद्धा मला मनासारखी नोकरी मिळत नव्हती. आणि मिळाली तरी काही ना काही कारणास्तव मी ती सोडत होतो, जास्त दिवस त्या ठिकाणी टिकतच नव्हतो. आई, अप्पा मला जेंव्हा जेंव्हा नोकरी अथवा कामाविषयी बोलायचे तेंव्हा तेंव्हा भाऊ मला सांभाळून घ्यायचा.

कालांतराने भाऊचे लग्न झाले त्यानंतर काही वर्षातच अप्पा आम्हाला सोडून गेले. अप्पा गेल्यानंतर आमच्या संपूर्ण कुटुम्बाची जबाबदारी भाऊवरच आली. आमच्या सर्वांच्यात लहान असणारी बहिण देखील लग्न होवून सासरी गेली. या सर्व खर्चाचा भार पेलता पेलता भाऊची होणारी ओढाताण त्याच्या चेहऱ्यावरून जाणवत होती. साहजिकच माझ्याकडूनही त्याच्या बऱ्याच अपेक्षा होत्या पण मी त्या पूर्ण करू शकत नव्हतो, त्यामुळे माझ्यावर दडपण येवू लागले. नाईलाजास्तव घराजवळच्याच एका कपड्याच्या दुकानात काम करू लागलो, आणि कधी नव्हे ते मला पगार मिळू लागला. सात-आठ महिने झाले नसतील इतक्यात त्या दुकानाला आग लागल्यामुळे ते दुकान बंद झाले आणि मी बेकार झालो. आई सोडून कोणीही काही बोलत नव्हते, तरी सुद्धा घरी बसून दोन वेळचे जेवण जेवताना मला अपराध्या सारखे वाटू लागले.

पाठच्या भावाचे शिक्षण पूर्ण होताच त्याला अप्पांच्या जागेवर शिक्षकाची नोकरी लागली. दोन्ही भावांपेक्षा चांगल्या मार्कांनी शिक्षण पूर्ण करून सुद्धा मी घरी बसून होतो. हे न

बघवून वडील बंधू या नात्याने भाऊनी आपल्या नावावर बँकेतून कर्ज काढून मला एक रिक्षा घेवून दिली. दीड दोन वर्षे रिक्षा चालवत बऱ्यापैकी जम बसवत होतो. इतक्यात एक दिवस शेजारच्या घरातला एक पेशंट माझ्या रिक्षात घेवून दवाखान्यात गेलो होतो. पेशंट सोबत मी पण डॉक्टरकडे गेलो, आणि बाहेर येवून बघतो तर माझी रिक्षा जागेवर नव्हतीच म्हणजे चोरीला गेलेली. दोन दिवस अन्न पाणी विसरून दिनरात्र रिक्षा शोधत फिरलो पण माझी रिक्षा काही मिळाली नाही. घरी सांगितले नसल्यामुळे घरच्यांनी माझी शोधाशोध केली. दोन दिवसांनी जेंव्हा परत आलो, पहिल्यांदाच भाऊनी बरेच सुनावले आणि दुसरे काहीतरी करण्याचा सल्ला दिला. मी काहीच करू शकत नाही या भावनेने मी घरातच राहू लागलो.

लहान भावाला लग्नासाठी मुली येवू लागल्या, पण माझे झाल्याशिवाय तो लग्नाला तयार होत नव्हता. आणि माझी संसाराची घडी अजूनही बसत नव्हती, त्यामुळे मला कोणीही मुली द्यायला तयार नव्हते. चरितार्थ चालवण्यासाठी माझी धडपड चालली असतानाच, मला एका विमा कंपनीमध्ये नोकरी मिळाली. पाच सहा महिन्यात माझे लग्न झाले, आणि सगळे सुरळीत चालेल असे वाटत होते. पण  लग्न होवून एक महिनाही झाला नव्हता एक दिवस माझी पत्नी चक्कर येवून पडली. दोनतीन दिवस  दवाखान्यात राहिल्यानंतर ती शुद्धीवर आली. तिला लहानपणापासून चक्कर आणि वेडाचे झटके येत असावेत असे डॉक्टरांनी सांगितल्यानंतर माझ्या पायाखालची जमीनच सरकली. माझ्या सासरच्यांना त्या संदर्भात विचारल्यावर त्यांनी माझ्यावरच मारहाण केल्याचा आरोप करून तिला आपल्या घरी घेवून गेले. मी तिला परत आणण्यासाठी सासरी गेलो तर ती मला ओळखूच शकली नाही. माझ्या सासरच्यांनी मला अपमानित करून हाकलून काडल्या नंतर मी परत घरी आलो, बायकोला पण व्यवस्थित सांभाळू शकत नसल्याचे आईने आणि भाऊने मला बोलून दाखवले.

काही दिवसातच माझ्या लग्नासाठी थांबलेल्या माझ्या लहान भावाचे लग्न झाले, त्यानंतर मला फारच एकटेपणा जाणवू लागला. कितीही झाले तरी आणि कशीही असली तरी

ती माझी पत्नीच आहे म्हणून मी सासरी जायचो, सासरचे जे काही बोलतील ते मुकाटपणे ऐकून यायचो. त्यांनी कितीही अपमान केला तरी सहन करत होतो आणि घरच्यांनाही सांगत नव्हतो, कारण ती बरी होईल आणि परत माझ्याशी अर्धवट राहिलेला संसार सुरु करेल याच आशेवर. आठ दहा दिवसाच्या अंतरानी एक दिवस सासरी गेलो तर सासरच्यांनी मला घराबाहेरच थांबवले आणि दोन दीवसापूर्वीच तिने विहिरीत उडी मारून आत्महत्त्या केल्याचे सांगून मला परत पाठवले. अशा रितीने माझ्या जीवनात संसाराची होणारी पहाट पुन्हा अंधाराने घेरली गेली. माझ्या घरचे त्यांना भेटण्यासाठी गेल्यावर तिला लहान पणापासूनच वेडाचे झटके येत होते पण लग्नानंतर तिचा हा आजार बरा होईल असे कोणत्या तरी मांत्रिकाच्या सांगण्या वरून तिचे लग्न केल्याचे तिच्या घरच्यांनी सांगितले. आणि त्या वेडाच्या तंद्रीतच तिने त्या दिवशी आत्महत्त्या केल्याचे सांगून आमची माफी मागितली.

माफी मागून सासरचे मोकळे झाले पण त्याचा माझ्या आयुष्यावर इतका खोल परिणाम झाला कि मी त्यातून सावरुच शकलो नाही. माझ्या घरच्यांसोबत राहून सुद्धा घरच्यांपासून मी दूर जात असल्याची भावना माझ्या मनात येवू लागली. मी एकटा एकटा राहू लागलो आणि ते एकटेपणच माझ्या घरच्यांपासून मला अंतर देवू लागले. सर्वजण माझा तिरस्कार करत असल्याची भावना माझ्या मनात डोकावू लागली, आणि झालंही तसंच. ज्या ठिकाणी मी काम करत होतो त्या विमा कंपनीतील पाच-सहा लोकांच्या विमा हप्त्याचे पैसे माझ्या हातून हरवले गेले. कंपनीने मला कामावरून कमी केले आणि माझ्याविरुद्ध कंपनीने पोलिस तपास करण्याची तयारी चालवली. अर्थात यातून पुन्हा मला भाऊच वाचवू शकत होता, त्याशिवाय पर्यायाच नव्हता. घाबरत घाबरत मी आई आणि भाऊला ही बातमी सांगितल्यावर भाऊने मला वाचवले खरे पण माझ्याशी बोलणेच बंद केले. भाऊच काय घरचे सर्वजण माझ्याशी बोलणे टाळू लागले, फक्त आई आणि वाहिनीच कधीतरी बोलायच्या. आणि अशा तऱ्हेने मी पुन्हा बेकार आणि माझ्या आयुष्यात पुन्हा वनवास सुरु झाला.

आत्तापर्यंत बरेच वेळा मी बेकार होवून घरी बसत होतो, त्यावेळी पेक्षा आत्ताच्या बेकार होण्यात खूपच फरक जाणवत होता, तो म्हणजे माझ्या लहान भावाची बायको. ती मला माझ्या तोंडावरच माझ्या घरी बसून राहण्याबद्दल घालून पडून बोलायची. आईला, भावांना आणि वाहिनीला याचे वाईट वाटायचे पण तिच्या फटकळ बोलण्यामुळे सर्वजण गप्प असायचे. अर्थात तिचे तरी काय चुकीचे होते म्हणा, मला माझा संसारच करता आला नव्हता. काहीतरी काम करायचेच म्हणून मी जवळच्याच एका नाट्यगृहात डोरकीपरचे काम करू लागलो. ते नाट्यगृह व्यवस्थित चालत नसल्यामुळे पगार अगदीच कमी मिळायचा, पैसे मिळवण्यापेक्षा घरच्यांपासून लांब राहणेच त्या मागचा हेतू होता. घरी देण्याइतकी कमाई करू शकत नव्हतो, याचा भार पर्यायाने दोन्ही भावांच्या वरच पडत होता. याचा वेगळाच परिणाम झाला, तो म्हणजे लहान भावाच्या पत्नीने राहत्या घरातच वेगळी चूल मांडली. नातेवाईकांच्या मध्यस्थीने घरातच भिंत बांधून लहान भाऊ आणि त्याची पत्नी विभक्त झाले, आणि सर्वांच्या नजरेत या प्रसंगाला सुद्धा मीच कारणीभूत ठरलो, जे नियतीला मान्य होते.

अपेक्षेप्रमाणे काही दिवसातच ते नाट्यगृह बंद पडले आणि मी पुन्हा बेकार झालो. मिळेल ते काम आणि मोलमजुरी करत दिवस काढत होतो, आणि एक दिवस त्या बंद पडलेल्या नाट्यगृहाच्या शेटनी मला बोलावून घेतले. त्या नाट्यगृहाच्या जागेवर चित्रपटगृह बनत होते आणि माझ्यावरील विश्वासामुळे तेथील देखरेख करण्याचे काम मला दिले. काही महिन्यात चित्रपटगृह पूर्ण झाले आणि मला तिथे पुन्हा डोरकिपरचे काम मिळाले. कधी कधी मला तिकीट विक्री पण करायला लागायची. चित्रपटगृहामध्ये काम करत असताना चांगले-वाईट बरेच लोक भेटत होते. काम करता करता सर्वांनाच आदराने बोलवायची सवय मला लागली. घरीपण भाऊ जरी माझ्याशी बोलत नसले तरी सवयी नुसार भाऊला पण भाऊराव म्हणू लागलो. भाऊला भाऊराव म्हणणे म्हणजे त्यांच्या विषयीचा आदर कि त्यांच्या आणि माझ्यातले वाढणारे अंतर होते, हे मलाच कळत नव्हते.

सकाळी दहा वाजता गेल्यानंतर घरी यायला रात्रीचे एक दोन वाजायचे, आणि आठवड्याची सुटी देखील घेत नव्हतो. त्यामुळे घरी जास्त रहातच नसे. एका दृष्टीने ते बरेच झाले, कारण अबोल पणाने घरी राहण्यापेक्षा स्वत:ला कामात गुंतवून ठेवलेले बरे वाटत होते. एकटे पणामुळे असेल कदाचित, चित्रपट गृहामध्ये साफसफाई करणाऱ्या एका महिलेशी माझी जवळीक वाढू लागली. काही वर्षांपूर्वीच तिचा नवरा वारल्यामुळे ती एकटीच होती. मनातल्या गोष्टी एकमेकासमोर बोलून मन मोकळे करता करता एकमेकाचे साथीदार कसे झालो कळलेच नाही. काही दिवसानंतर ती माझ्या परस्परच आमच्या घरी आली आणि आमचे असणारे संबंध घरच्यांसमोर सांगितले.

"तुला भाऊ म्हणायची सुद्धा मला लाज वाटते, आयुष्यात एक तरी चांगले काम केलंय का?" असे म्हणत भाऊरावांनी त्यादिवशी माझे स्वागत केले आणि नातेवाईकांच्या सल्ल्याने घरामागच्या खोलीत तिला घेवून राहण्यास सांगितले.

लग्न न करताच नवरा बायको म्हणून आम्ही घराच्या मागच्या बाजूला असणाऱ्या खोलीत राहू लागलो. मागच्या बाजूने आमच्या घराला वेगळाच रस्ता असल्याने आमचा माझ्या घरच्यांशी संबंधच येत नव्हता. भग्न झालेल्या वाड्याच्या दगडी भिंतीवर एखादे गवताचे रोपटे येवून वाऱ्यासोबत डोलावे त्याप्रमाणे माझ्या दिशाहीन आयुष्याला नवी दिशा मिळाल्याचे समाधान झाले.

एक दीड महिने सुरळीत चालले होते आणि अचानक ती बाई दोन मुलांना घेवून घरी आली आणि आपलीच मुले असल्याचे तिने सांगितले. जी कधी आमच्या चर्चेत आलीच नव्हती, म्हणजे तिला मुले असल्याचे मला माहितीच नव्हते. ती दोन्ही मुले सुद्धा आमच्या सोबत राहू लागली. जसजसे दिवस पालटत होते, तसे दगडी भिंतीवर डोलणारे रोपटे गवताचे नसून काटेरी झाडाचे; निवडुंगाचे असल्याची टोचणी माझ्या मनाला जाणवू लागली. आयुष्यातल्या अनेक धक्क्यांमुळे आणि वाढत्या वयामुळे शरीर साथ देण्यास असमर्थता दाखवू लागले. समोर जे दिसेल, जे भोगायला मिळेल त्याप्रमाणे दिवस काढत जगत होतो.

आम्ही एकत्र राहू लागल्या नंतर त्या बाईने नोकरी सोडून दिली आणि घरीच आपल्या मुलांना सांभाळत राहू लागली. पुन्हा थोडेफार साठवलेले पैसे त्या बाई आणि तिच्या मुलांसाठी खर्च होवू लागले आणि माझे दिवस-रात्र राबून त्यांना पोसायचे दिवस सुरु झाले. यथावकाश मुले मोठी होवू लागली, त्यांच्या वाढत्या खर्चामुळे पैशांची चणचण भासू लागली. संसार चालवण्यासाठी त्या बाईला पुन्हा नोकरी करण्यास सांगितले तर त्या मुलांसकट बाई माझ्या अंगावर धावून आली; म्हणून मी त्या तिघांना घर सोडण्यास सांगितले तर, माझा त्या बाई सोबतच्या लग्नाचा दाखला आणि आम्हा चौघांची नावे असलेले रेशन कार्ड दाखवले. मला कळलेच नाही हे या बाईने कधी केले, हा तिचा नियोजित डाव होता. त्या नंतर माझा आवाजच बंद झाला आणि त्या बाईला लग्न न करताच बायको आणि त्या मुलांना जन्माला न घालताच मुले मानावे लागले. हा प्रकार घरच्यांना पण सांगणार तरी कसा, घरचे कोणी माझ्याशी बोलतच नव्हते, आणि सांगितले तरी ते काही करू शकत नव्हते, कारण माझ्या न केलेल्या कर्माची फळे मी भोगत होतो.

अशा रीतीने दिवस सरत होते, मी सगे-संबधितांशी संबंध तोडून संबंध नसलेल्यांसाठी राब-राब राबून दिवस काढत होतो. मुले मोठी झाली, कुठेतरी नोकरी करू लागली तरी माझ्या राबण्यात काही फरक पडत नव्हता. आणि एक दिवस मी सकाळी उठायला गेलो तर मला उठताच आले नाही. मला प्रचंड वेदना होवून काही क्षणात माझ्या शरीराच्या एका बाजूला संवेदनाच नाहीत असे जाणवू लागले. कुणाला तरी बोलवावे म्हणून हाक मारायला गेलो तर तोंडच उघडले जात नव्हते. माझी परिस्थिती बघून त्या बाईने आणि दोन्ही मुलांनी मला डॉक्टरकडे घेवून गेले, मला अर्धांगवायूचा झटका आला होता. दोन-तीन दिवस दवाखान्यात ठेवल्यानंतर थोडे बरे वाटू लागले. डॉक्टरांनी औषधे दिली व मसाज करायला सांगितले पण ते कोण करणार, म्हणून बरेच लांब खेडे गावात असणाऱ्या एका समाजसेवी संस्थेत भरती करण्यात आले, जेथे वेगवेगळया आजाराचे बरेच अनाथ रुग्ण होते. माझे दैव पण कसे होते,

तीन चार-वर्षात त्यातून मी बरा झालो. म्हणून त्या संस्थेने मला घरी जाण्यास सांगितले, आणि परत मी घरी आलो आणि त्या बाई, मुलांसोबत राहू लागलो.

परत इथे राहायला आल्यानंतर तरी माझ्या घरचे मला भेटायला येतील असे वाटले होते, पण कोणीच आले नाही. दोनतीन दिवसांनी अचानक माझी वहिनी मला भेटायला आली, आणि माझ्या डोळ्यातून अश्रूंच्या धारा वाहू लागल्या. विचारपूस करून झाल्यानंतर एका वर्षापूर्वीच माझी आई सोडून गेल्याचे मला तिने मला सांगितले आणि माझ्या काळजात धस्स झाले. ही अतिशय दुख:द बातमी मला कळवावे असे कोणालाच वाटले नव्हते कि जाणून बुजून कळविले नव्हते हा प्रश्न माझ्यासाठी आजही प्रश्नच आहे. आजारपणामुळे मी काठी धरून पाय ओढत-ओढत घरातच फिरत असल्यामुळे बाहेर कुठेही जावू शकत नव्हतो, आणि मी बाहेर गेलेले त्या मुलांना आवडत नसे. माझी कमाई पूर्णपणे बंद झाल्यामुळे मला त्यांच्यावरच अवलंबून रहावे लागत होते, त्यामुळे मला त्यांचे बोलणे ऐकावेच लागत होते. जे मिळेल, आणि जसे मिळेल तसे खात होतो, प्रसंगी मार सुद्धा !!!

ती बाई आणि मुले घरी नसताना कधीकधी मी भाऊरावांच्या घरी जावू लागलो, मला बघताच भाऊसाहेब न बोलता बाहेर निघून जात असत. पण वहिनी माझ्याशी बोलत असे, मी तिच्यामध्येच माझी आई बघत होतो, आईशी कित्येक वर्षे बोललो नव्हतो आणि आता बोलू शकणारही नव्हतो, ते वहिनीशी बोलून समाधान मानत होतो. ती अशी एकमेव व्यक्ती होती जिचा इतक्या वर्षानंतरही माझ्याशी वागण्यात फरक पडला नव्हता. मला सगळ्यांच्या कडून मिळणारी वागणूक, माझ्याकडून झालेल्या चुका तिच्या समोर मांडत होतो. पूर्वी कधी खाल्ले होते आठवतही नव्हते असे चांगले खाणे तिथे मला खायला मिळत होते. हळूं हळू मला हालचाल करणेही मुश्किल होवू लागल्याने मी खोलीतच पडून राहू लागलो.

सकाळ पासून मला फारच वेगळे काहीतरी वाटत होते, लहान पणीचे दिवस आठवत होते. चारही भावंडे सोप्यावर खेळत असल्याचे चित्र डोळयासमोर दिसत होते, आई-आप्पा, आयुष्याचे सगळे चित्र फिरून फिरून माझ्यासमोर दिसत होते.

दुपारी कुणीतरी मला चमच्याने काहीतरी पाजवत असल्याचे अंधुकसे कळत होते, त्यातले काही माझ्या तोंडावर ओघळल्याचे जाणवले आणि मला कधी झोप लागली कळलेच नाही.

जाग आली तर एका मोटारीतून ती बाई आणि मुले मला कुठेतरी घेवून चालले होते. आणि काय चमत्कार मलाच माझा चेहरा दिसत होता, बिना आरश्याचा; मी माझा चेहराच काय माझा अख्खा देह मी माझ्यासमोरच पहात होतो. माझा देह एका दवाखान्यात नेताच डॉक्टरांनी मी मृत असल्याचे सांगितले. म्हणजे मी वेगळा झालो होतो त्या आकार असलेल्या देहापासून, आकारहीन आत्मा. एखादा मनुष्य मृत झाल्याचे समजताच त्याच्या आसपासचे काहीजण दु:खाने हंबरडा फोडून रडताना मी बरेच वेळा पाहिलेले होते. पण मी मृत झाल्याचे समजताच त्या दोन्ही मुलांच्या चेहऱ्यावर एक समाधानाचे हास्य उमटल्याचे मला स्पष्ट जाणवले. आणि तो देह घरी न नेता बाहेरच नेण्याचे त्यांनी तिघांनीही ठरवले.

माझा मृतदेह दवाखान्यातून स्मशानातच आणला गेला, कारण घरी नेण्याची कोणाची इच्छाच नव्हती. अंत्य संस्काराला आलेल्यात भाऊरावांना मी शोधत होतो, ते येतील आणि तेच माझे अंतिम संस्कार करून मला मुक्ती देतील; पण भाऊराव दिसतंच नव्हते. जे कोणी आले होते ते सुद्धा नाईलाजास्तव आल्याचे प्रत्येकाच्या चेहेऱ्यावर जाणवत होते. नात्यापैकी फक्त पाठचा भाऊ माझ्या अंत्यसंस्काराला आला होता, तो पण काही अंतरावर थांबून शांत पणे माझ्या चीतेकडे बघत होता. माझा निष्प्राण देह तो पाहू शकत असला, तरी मी त्याला दिसत नव्हतो, तरीही त्याच्याकडे निरखून बघण्याचे धाडस माझ्यात नव्हते. पण त्याच्या डोळयाच्या कडा ओलावलेल्या जाणवत होत्या, यातच काय ते थोडेफार समाधान होत होते.

माझा निष्प्राण देह त्या धगधगणाऱ्या चितेवर शांत पणे जळत होता, जळत असून सुद्धा त्या देहाला काहीच वेदना होत नव्हत्या, पण त्याच देहापासून वेगळा झालेल्या पण जळू न शकणाऱ्या आत्म्याला मात्र वेदना होत होत्या. "या जगण्यावर, या मरण्यावर शतदा प्रेम करावे" असे कोणीतरी म्हटलेले ऐकलं होतं, पण माझ्यासाठी काहीच लागू होत नव्हतं. ना परत प्रेम करण्यासारखे जगलो, ना प्रेम करण्यासारखे मेलो. फक्त जगलो होतो मानवी जीवन मिळाले म्हणून आणि मेलो होतो एकदाचे मरायचे होते म्हणून इतकेच काय ते माझं जीवन. शरीर आणि आत्मा एकत्र असताना, वेदना व्यक्त तरी करू शकत होतो, अश्रूंच्या रूपाने; रडून, पण आता व्यक्तच करू शकत नव्हतो. फक्त सहन करत होतो, नव्हे सोसत होतो आणि त्या शिवाय पर्यायही नाही.

*******

काही वेळातच त्या शरीराला पूर्णपणे नष्ट करून तो अग्नी शांत होईल. त्याचे निखारे होवून ते पण शांत होतील. मग त्याचे कोळसे आणि राख होईल. दोन दिवसांनी पुन्हा काही लोक येतील, ती रक्षा गोळा करून विसर्जन करायला; माझे उरले सुरले मानवी अस्तित्व सुद्धा संपवायला. आणि मी पण आता फक्त त्याच दिवसाची वाट पाहत होतो, फक्त एकाच आशेवर;

“त्या दिवशी भाऊराव येतील! - - - - -

नाही नाही माझा भाऊ येईल आणि - - - - - -

आणि आमच्या बालपणीच्या आठवणी जागवून; दोन थेंब अश्रुंचे दान माझ्या रक्षेत सांडून, आपल्या हातानी माझ्या रक्षा विसर्जन करील; आणि मला निरोप देईल;

“अखेरचे येतील माझ्या… !!!!”

§§§§§§§§§§

# <u>तेथे तुझी मी वाट पहाते !!!</u>

**झा**ले एकदाचे, अरविंदचे शुभ मंगल झाले. मनाप्रमाणे त्याचे लग्न पार पडले आणि त्याच्या घरच्यांनी मोकळा श्वास घेतला. लग्न, त्याआधीच्या आणि पाठोपाठच्या पूजा, गोंधळ आणि स्वागत समारंभ देखील पार पडले. कार्यक्रमाला आलेले पै-पाहुणे आपापल्या गावी निघून गेले. आणि दहा बारा दिवस नातेवाईकांनी भरलेले घर शांत शांत झाले. घरातील मंडळी देखील कार्यक्रमातील प्रसंग आणि गमती-जमती मनात साठवून आपापल्या कामाला लागली.

गेले दोन-तीन वर्षापासून लग्न करण्यासाठी घरचे त्याच्या मागे लागले होते, पण हा तयारच होत नव्हता. कसं काय माहित नाही, दोनेक महिन्यापूर्वी तो लग्नाला तयार झाला, आणि एका चांगल्या घरचं स्थळ आलं. मुलगी दिसायला चांगली आणि त्याच शहरात नोकरी करणारी होती, घरची परिस्थिती पण चांगली असल्यामुळे सर्व काही मनासारखे घडून आले आणि सर्व कार्य यथोचित पार पडले. आधीच केलेल्या नियोजनानुसार, आज सकाळी सकाळीच तो आपल्या पत्नीला घेवून पाच सहा दिवसासाठी दूर प्रवासाला निघाला होता, आपल्याच धुंदीत, आपल्याच जगात ......... !!!!!

*****

**स**काळची वेळ, त्या कोवळया उनासोबतच सुटलेला शांत वारा, त्या वाऱ्यासोबतच जमिनीकडे झेपावणाऱ्या त्या समुद्राच्या लाटा. एकंदरीतच प्रसन्न असे सकाळचे वातावरण होते. समुद्राच्या काठाला काही अंतरावर नारळाची-पोफळीची झाडे. त्या झाडीतून काही अंतर चालत गेल्यावर आंब्याची, जांभळाची, फणसाची अशी अनेक प्रकारची झाडे. त्या गर्द झाडीतच काठ्यांचे,लाकडांचे बांधलेले कुंपण आणि त्या कुंपणाच्या मधोमध एकुलते एक लाल दगडातले

छोटेसे बसके कौलारू घर. असे वाटत होतं कि समुद्राला मोठ्ठी भरती आल्यावर समुद्राच्या लाटा त्या नारळा-पोफळीच्या झाडाच्याही पुढे येत असाव्यात.

त्या बसक्या घराच्या मागच्या दरातील छोट्याशा पण खोल अशा विहिरीच्या बाजूने निघालेली ती छोटीशी पायवाट, गर्द झाडीतून त्या निर्जन समुद्राकाठी येत होती. त्याच छोट्याशा वाटेवरून, झाडावरून पडलेल्या वाळलेल्या पानांचा पावलांनी तुडवून सळ-सळ असा आवाज करत येवून ती, त्या अथांग समुद्राच्या काठावर अश्रू भरलेल्या डोळयांनी एकटीच गुणगुणत फिरत होती:

"जिथे सागरा धरणी मिळते, तेथे तुझी मी वाट पाहते!"

येणाऱ्या लाटांच्या पाण्यातून, आपल्या पायांचे ठसे त्या वाळूत उमटवत. वाळूत उमटलेल्या तिच्या पायांचे ठसे त्या लाटा पुन्हा पुन्हा मिटवत होत्या, ती त्यांच्या मिटण्याची फिकीर न करता अशीच फिरत असे, रोजच, सकाळी-संध्याकाळी कधीही, वाट बघत - - - - - -,

पण ती आहे तरी कोण ?

"रंगात रंग तो श्यामरंग पाहण्या नजर भिरभिरते, ऐकून तान विसरून भान ही वाट कुणाची बघते ।

त्या सप्तसुरांच्या लाटेवरुनि साद ऐकुनी होई - राधा ही बावरी, हरीची राधा ही बावरी !!!"

होय राधाच आहे ती,

त्याच्या सादाची; त्याची वाट बघणारी, बावरी राधा, - - - - - वेडी राधा !!

*****

**त्या**च्याशी जेंव्हा ओळख झाली तेंव्हा ती वेडी नव्हती, पण साधी होती एकदम साधी-भोळी. त्यावेळी ती, तिची आई आणि भाऊ इथून दहा-बारा तासांच्या अंतरावर असणाऱ्या एका मोठ्या शहरात रहात होते. भाऊंच्या; म्हणजे तिच्या वडिलांच्या आकस्मित आजारपणामुळे त्यांची नोकरी गेली. त्यामुळे दुसऱ्यांच्या घरी घरकाम करणाऱ्या आईला मदत म्हणून ती शिक्षण कमी झालेले असले तरी मिळेल ती नोकरी करू लागली. कामाच्या ठिकाणी जात असताना रस्त्यात त्याच्याशी तिची ओळख झाली, ती चालत जात असता तो तिला आपल्या बाईक वरून कामाच्या ठिकाणी आणि परत घराजवळ आणून सोडत असे. एकदम साधा आणि सरळ स्वभाव असणारा तो, कोणत्या तरी कंपनीत चांगल्या पदावर होता. त्याचे घर तिच्या घराच्या पुढे बऱ्याच अंतरावर होते, आणि येण्या-जाण्याची वेळ पण तिच्या वेळेप्रमाणेच होती, अगदी जुळवून आणल्यासारखी.

भाऊंना झालेला आजार वाढतच होता, त्या आजारपणात त्यांना आयुष्यात पै-पै साठवून घेतलेले शहरातले छोटेसे घर पण विकावे लागले. समुद्राकाठी थोडीफार शेती होती, पण त्यावर घर चालूच शकत नव्हते, म्हणून भाऊ तिच्या जन्मापासूनच, तिला आणि तिच्या आईला घेवून शहरात राहून नोकरी करत होते. त्यामुळे गावात तिची तशी कोणाशीच ओळख नव्हती. गेल्या आठ-दहा महिन्यापासून स्वत:चे घर विकून भाड्याच्या छोट्याश्या खोलीत ते तिघेही रहात होते. भाऊ आजारातून बरे होणार नाहीत असे डॉक्टरांनी सांगितल्यावर गेल्या काही महिन्यापासून ते शहर सोडून आपल्या गावात आले. पण गावातल्या भाऊबंदांनी त्यांना समुद्राकाठी असणाऱ्या जुन्या घरात राहावयास दिले.

भाड्याच्या घरात राहायला आल्यानंतर त्याच्याशी तिची ओळख झाली आणि तिच्या एकटेपणा आलेल्या आयुष्याला त्याची सोबत मिळाली. त्याच्या सोबत आपले मन मोकळे करता करता ओळखीचे रुपांतर मैत्रीत झाले. पुढे त्याने तिच्या बिकट परिस्थितीत तिला दिलेली साथच तिच्या आयुष्याला सुखद प्रेमाची झालर लावून गेली. त्यांचे हे प्रेम प्रकरण दोघांच्याही घरच्यांना

माहित नव्हते, आणि त्याचा स्वभाव तिला शंका घेण्या सारखा वाटत नव्हता. त्याने दिलेल्या शपथेच्या विश्वासावर तिने आपले सर्वस्व त्याला कधी अर्पण केले कळलेच नाही. दोघांच्यात जोडले गेलेले नाते-संबंध लग्न न करताच अतूट असल्याची दोघांनाही जाणीव होवू लागली.

भाऊंचा आजार कमी होण्याची काहीच आशा नसल्याने, आणि शहरात खर्च परवडत नसल्याने आई आणि भाऊंनी शहर सोडून आपल्या गावी जायचा निर्णय घेतला. त्यांच्या निर्णयाला अशा परिस्थितीत विरोध करणे तिला शक्यच नव्हते, म्हणून तिला त्यांच्या प्रमाणेच वागावे लागले. त्याला जेव्हा ती शेवटची भेटली तेव्हा त्यानेच तिला धीर दिला होता, आणि तिला नेण्यासाठी तिच्या गावी येण्याचे आश्वासन सुद्धा.

" जेथे सागराला धरती मिळते न त्याच ठिकाणी म्हणजे तुझ्या घरी येवून तुला घेवून जाणार पण तुला फक्त त्या क्षणाची वाट बघावी लागेल. इथून निघणारी ट्रेन संध्याकाळी तुझ्या गावाजवळच येते मला माहित आहे. मी त्याच ट्रेन ने येणार एक दिवस. पण तुला फक्त वाट बघावी लागेल त्या दिवसाची, त्या क्षणांची !!!"

परत भेट होईपर्यंत पत्रातून आपल्या भावना एकमेकांस कळवत राहायच्या आश्वासनाने ती त्याच्या पासून लांब गेली. आयुष्यात आलेले सुखाचे काही क्षण मनात साठवून ती आपल्या आई वडिलांसोबत आपल्या समुद्रकिनारच्या गावाला परत गेली. दिलेल्या आश्वासनानुसार त्यांचा पत्र व्यवहार सुरु होता. या गोष्टींची आईला पण कुणकुण लागली होती पण आपली लेक चुकीचे काही करणार नाही या खात्रीने ती जास्त लक्ष देत नव्हती. बघता बघता दीड दोन महिने संपले. एक दिवस ती अस्वस्थ दिसू लागली आणि तिच्या आईला चाल-चलनात काहीतरी फरक जाणवू लागला. तिला आईने खोदुन खोदुन विचारल्यानंतर तिने आईला सगळा प्रकार सांगितला, आणि आईला धक्काच बसला. शेवटचे काही दिवस जगणाऱ्या भाऊना हा धक्का सहन होईल की नाही या भीतीने आईने ही बातमी त्यांना सांगितलीच नाही. पण झालेल्या घटनेवर तोडगा काढण्या साठी तिने त्याला कळवण्यास सांगितले.

ज्यावेळी तिने पत्रातून ही वार्ता त्याला कळवली; त्याच्या कडून काहीच उत्तर आले नाही. ती रोजच त्याची, त्याच्या पत्राची वाट पहात होती; पण तिचे वाट पाहणे संपतच नव्हते. गेल्या एक दोन महिन्यापासून त्याचे पत्रच आले नव्हते, आणि तिने पाठवलेल्या पत्रांना उत्तर पण. त्याने तिच्याशी पत्रव्यवहारच बंद केला. त्याच्याशी संपर्क कसा साधावा तिला कळत नव्हते, घरच्यांशी म्हणजे आई आणि भाऊंशी तरी काय आणि कसे बोलणार. शहर सोडून इकडे येताना तो तिला भेटला होता आणि रीतसर लग्न करून तिला सोबत घेवून जाण्याची शपथ पण दिली होती. ती फक्त त्याच आशेवर जगत होती, त्या दिवसाची वाट बघत, त्याने तिच्यावर केलेल्या प्रेमाची आठवण जपत. ज्या घटनेमुळे स्त्रीला आपल्या पूर्णत्त्वाची जाणीव होवून आनंद होतो तीच घटना तिच्याही आयुष्यात घडली होती. पण तिचं दुर्दैव, की त्याच घटनेमुळे ती दुःखाच्या लाटेमध्ये गुरफटली गेली होती.

आईची होणारी घुसमट, त्यातून तिचा होणारा त्रागा आणि त्याच्याकडून न मिळणारा प्रतिसाद अशा घटनांमुळे तिचे मन तळमळत होते. काय करावे सुचत नव्हते. आई आणि मरणोन्मुख भाऊंच्या समोर जाताना तिला स्वत:चीच लाज वाटत होती म्हणून ती त्यांना टाळू लागली. या विचारात ती दिवस भर एकटीच घराजवळच्या निर्जन समुद्राकाठी फिरत असे.

आजही ती वेडी सकाळपासून त्याला भेटण्यासाठी आतुर होवून, सगळं काही विसरून गुणगुणत त्याची वाट बघत समुद्राकाठी फिरत होती!

**सं**ध्याकाळी उतरती कडे जाणारा सुर्य आपला प्रखर तेजस्वीपणा कमी करून तांबूस झाला. आणि आपल्या प्रकाशाचे साम्राज्य संपवून, धरतीला अंधाराच्या स्वाधीन करत क्षितिजापलीकडे लपू लागला. तरीही ती त्या समुद्राच्या काठावरून, खारट पाण्याच्या तुषारांनी भिजलेल्या आणि डोक्यावरचे केस विस्कटलेल्या अवस्थेत; तहान भूक विसरून चालतच होती.

आपल्याच तंद्रीत;

बेभान होवून गुणगुणत,

"तेथे तुझी मी वाट पाहते, वाट पाहते, वाट पाहते, वाट पाहते !"

किती वेळ झाले आणि किती लांब चालत होती तिलाच माहित नव्हते, आणि इतक्यात;

इतक्यात दूर कुठूनतरी ट्रेनची शिटी ऐकू येवू लागली आणि चमकून, तिच्या गुणगुणण्या सोबत चालणारे पायही जागेवरच थांबले. आणि ती आपल्या पोटावर हात ठेवून त्या वाजणाऱ्या शिटीच्या दिशेने, पाणावून आटलेल्या पण भिरभिरत्या नजरेने पाहू लागली.

आपल्या पोटात वाढणाऱ्या त्याच्या प्रेमाच्या चिमुकल्या प्रतीकाला जणू सांगत होती,

" तो येणार, माझा रवी येणार; याच ट्रेनने येणार आणि आपल्या दोघानाही घेवून जाणार,- - - - तेथे तुझी मी वाट पाहते !!!"

पण त्या वेडीला माहितच नव्हते कि, खरोखरच तिचा रवी याच ट्रेन मधून चालला होता आपल्या पत्नीचा अरविंद बनून, आपल्या सुखी संसाराची स्वप्ने रंगवत !!!

ट्रेनचा आवाज हवेत विरत जावून कमी कमी होत गेला, आणि दिवसभर अन्न-पाण्याविना चालून दमलेली, थकलेली ती, नकळत त्या आवाजाच्या दिशेने धावत सुटली डोळयात पाणी आणून, वेडी होवून; त्याच्या येण्याची स्वप्ने रंगवत !!!

आणि बडबडत,

"तेथे तुझी मी वाट पाहते - - - - - वाट पाहते - - - - - वाट पाहते - - - - - !!!"

§§§§§§

# तेथे तुझी मी वाट पाहते - - - - - - !!!

(उत्तरार्ध)

**रा**त्री साडे-आठ नऊ वाजण्याची वेळ, दाट अंधार पडलेला. जवळच समुद्रकिनारा असल्यामुळे दमट वातावरण. साधारण एका तासापुर्वीच ट्रेन निघून गेली होती आणि त्या नंतरची ट्रेन रात्री उशिरा असल्याने त्या छोट्याशा स्टेशनवर तुरळक वर्दळ होती. स्टेशनच्या बाहेर दोन तीन रिक्षा थांबलेल्या होत्या. तीनचारच टपरीपैकी उघड्या असणाऱ्या एका चहा-नाश्त्याच्या टपरीवर दोन तीन माणसे थांबली होती. रेल्वे रूळ दिसताच रुळाच्या मधून धावत ती स्टेशन पर्यंत आली, स्टेशन मधून येवून बाहेरील पायरीवर दमून बसली. बसल्या बसल्या तिला ग्लानी आली आणि तिथेच पायरीवर झोपून गेली. पुढची ट्रेन येणार म्हणून थोडीफार गर्दी होवू लागली. येणारे जाणारे तिच्याकडे बघून तसेच जात होते, पण ती कोण आहे? तिला काय झालंय? कोणीच बघत नव्हते.

ट्रेनची वेळ झाल्यामुळे भिक मागत फिरणाऱ्या मुलांनी पायरीवर पडलेल्या तिला पहिले आणि आपल्यातल्याच काही जणांना बोलावून सर्वजण तिच्या जवळ गेले. त्यांच्यातल्याच लहानग्या बाळाला घेतलेल्या एका बाईने तिच्या नाकापाशी हात नेला आणि लवकर पाणी आणण्यास सांगितले. एका चेपलेल्या भांड्यातून एकाने कुठूनतरी पाणी आणले आणि तिने त्यातले पाणी तिच्या तोंडावर शिंपडले. तोंडावर पाणी पडताच तिची थोडीशी हालचाल जाणवली आणि तिने मिटलेल्या डोळयानीच ते पाणी चाटायचा प्रयत्न केला. हे बघताच त्या सर्वांचा चेहरा आनंदाने खुलला. तिचे डोके आपल्या मांडीवर ठेवून घेवून त्या स्त्रीने त्या भांड्यातले पाणी तिला पाजवले. पाणी पिताच तिला थोडीशी शुद्ध आली पण डोळे काही उघडत नव्हती. त्यातल्याच एकाने, कुणीतरी दिलेला, चुरा झालेल्या बिस्किटचा अर्धा असणारा पुडा आपल्या फाटक्या खिशातून काढून तिला दिला. पाण्यात कुस्करून त्या स्त्रीने तिला ती बिस्किटे भरवली, आणि तिने ते खाल्ले देखील.

बिस्किटे आणि पाणी पोटात गेल्यामुळे तिला थोडे बरे वाटू लागले, पण तिचे डोळेच उघडत नव्हते. तिच्या सेवेत मग्न असणाऱ्या त्या पाच-सहा जणांच्या भिक मागणाऱ्या कुठूम्बाला ट्रेन कधी येवून गेली कळलेच नाही. या ट्रेन मधून काहीच भिक मिळाली नसल्याने सगळेजण हिरमुसले होते. काही वेळाने ती काही तरी बडबडत असल्याचे जाणवले आणि सगळे हिरामुसलेपणा विसरून, आनंदाने तिच्याशी बोलण्याचा प्रयत्न केला. पण ती काय बोलत होती कोणालाच कळत नव्हते. शेवटी त्या बाळाला घेतलेल्या बाईने तिला विश्रांतीची गरज असल्याचे सर्वांना सांगितले आणि सर्वांनी मिळून तिला थोड्याच अंतरावर असणाऱ्या त्यांच्या झोपडीत नेले. तिला जुनाट फाटलेल्या अंथरुणावर झोपवले, ती बाळ असणारी बाई तिच्या शेजारी बसून राहिली आणि बाकीचे सगळे आपापल्या भिक मागण्याच्या कामाला निघून गेले.

रात्री भिक मागून, स्टेशन मध्ये जिथे जागा मिळेल तिथे झोपून पहाटे-पहाटे ती तीन-चार मुले आणि त्या बाईचा नवरा त्या झोपडीत परत आले. त्या सर्व मुलांनी जमलेले पैसे त्या माणसाकडे दिले, आणि खायला मिळालेल्या भिकेतले फळे, बिस्किटे एकत्र करून ठेवले. ट्रेन येण्याची वेळ झाली म्हणून पुन्हा आपल्या कामाला लागले.

त्या झोपडीच्या फाटक्या छतातून उगवत्या सूर्याची कोवळी किरणे तिच्या डोळयावर पडताच तिला जाग आली आणि ती स्वत:ला कुठे आहे ते शोधू लागली. रात्रभर मांडीवर आपल्या बाळाला घेवून शेजारी बसलेल्या बाईने हसत " बरं वाटतं...य ?" असे विचारताच तिने मान हलवून होकार कळवला.

उठून बसली,

तिने "नाव काय हा तुजा?" विचारताच, तिने बोलण्याचा प्रयत्न केला आणि उघडलेले डोळे मिटून, "ती... ती...ती....थे.... त... त...तू...तू...झी - - - - -", असे काहीतरी बडबडली.

"पोटुशी हंस?" असे तिने विचारताच, पुन्हा, "ती... ती...ती....थे....त...तू...तू...झी - - - - - ", असे म्हणत होकारार्थी मान हलवली. काही दात तुटलेल्या कंगव्याने तिची वेणी घालता घालता त्या बाईने तिला ती कोण आहे, कुठून आली, घरच्यांच्या विषयी बरीच चौकशी केली, तर तिला काहीच सांगता येत नव्हते.

बाहेर बसलेल्या तिच्या नवऱ्याने हे सर्वकाही बघितले आणि जमलेले पैसे मोजून त्या पैशातून जमेल तसे दुध, पाव, तांदूळ, फळे आणि बरेच काही खायला घेवून आला.

तिचे बडबडणे ऐकून, ते सर्वजण तिला 'तिती' म्हणून बोलावू लागले. आणि दुसऱ्या दिवसा- पासून तिती मूकपणे त्या बाई सोबत स्टेशनवर जावू लागली.

अंगावर असणाऱ्या, मळलेल्या ओढणीच्या एका भागाची दोन्ही टोके दोन्ही हाताने पसरवून भिक कशी मागायची हे त्या बाईने आणि मुलांनी मुक्या तितीला शिकविले. येणारे जाणारे तिच्याही पसरलेल्या पदरात पैसे, शिळे अन्न, फळे टाकत होते.

पण नियती समोर मूकपणे पदर पसरून तिचं मन एकंच मागणं मागत होतं; ते पैसे नव्हे, अन्न नव्हे,

रवी, तिचा रवी, हो फक्त तिचा रवी !!!

*********

***माझे मनोगत:***

*" अन्याय झालाय; हो माझ्या कडून अन्याय झालाय, का माहित नाही पण असे मला राहून राहून वाटत होते. **'तेथे तुझी मी वाट पाहते'** ही लघु-कथा माझ्या मनातून कागदावर उतरवल्यानंतर मी त्रयस्थ पणे ही कथा वाचली, तेव्हा त्यातल्या नायिकेवर अन्याय झाल्याची भावना माझ्या मनात टोचत होती. पण कोणाला तरी न्याय द्यावा म्हटलं तर कोणावर तरी अन्याय होणारच, तो नकळत का असेना. मग ती कथा असो अथवा जीवन.*

*पण मनातली सल किंवा टोचणी काही कमी होत नव्हती. खूप विचार केल्यानंतर सुद्धा शेवट कसा करावा हेच कळत नव्हतं आणि कुणालाच योग्य न्याय देवू शकत नव्हतो. मग त्यातून एक मार्ग काढला; ही जबाबदारी मी तुमच्यावरच सोपवली.*

*उत्तरार्धाचा पुढील भाग वाचून आपणच आपल्यापरीने योग्य न्याय द्याल हीच अपेक्षा"*

*******

**अ**सेच चार पाच दिवस निघून गेले, एक दिवस नेहमीप्रमाणे सकाळी-सकाळी एक ट्रेन स्टेशन वर येवून थांबली. प्रवाश्यांची उतरण्याची-चढण्याची गडबड सुरु झाली. समोरून आणखी एक ट्रेन पण येणार असल्यामुळे ट्रेन बराच वेळ थांबली होती. तिती रोजच्या-प्रमाणे त्या मुलांसोबत स्टेशनवर ओढणीचा पदर पसरून फिरत होती. तिच्या सोबत असणारी मुले ट्रेनच्या आत फिरून भिक मागत होते, आणि ती खिडकीतून.

फिरता-फिरता एका खिडकीत तिचे लक्ष गेले, तर एका तरुणी शेजारी एक तरुण बसला होता. त्याला बघताच तितीच्या मुक्या झालेल्या ओठातून एकदम जोरात आवाज निघाला,

"रवि - - - !!!"

आणि त्या तरुणाने आवाज ओळखून पटकन खिडकीकडे पाहीले - - - - - !!!

'हिची अशी काय अवस्था झाली?, माझ्यामुळेच?, मीच जबाबदार आहे तिच्या या परिस्थितीला. पण मी जर तिला ओळख दाखवली तर पुढे काय होईल, माझ्या आईला मृत्युसमयी, तिने सांगितलेल्या मुलीशीच लग्न करण्याच्या वचनाचे काय होईल? पत्नीला काय वाटेल, घरच्यांना काय वाटेल?' या विचारांनी अरविंदचे डोके भणभणू लागले. त्यातूनच त्याने तत्काळ निर्णय घेतला आणि - - - - - - - - !!!

***

# { --१-- }

**तो** तोंड फिरवून विरुद्ध दिशेला बघू लागला. चोरट्या नजरेने हळूच त्याने खिडकी कडे पहिले, बराच वेळ झाला तरी ती त्या खिडकी शेजारीच थांबून होती. तो कंटाळून गेला, मधेच आपल्या पत्नीकडे पाहू लागला. यातून काहीतरी मार्ग काढायलाच हवा म्हणून तो विचार करत होता, एवढ्यात,

त्याची पत्नी म्हणाली,"ए बाई, काय हवंय तुला?, तो तुझा रवी नाही माझा नवरा आहे. वेडी आहेस का तू? कोणालाही काही बोलवायला, जा इथून. वेडी कुठली?"

"न्हाई ताई, तो रवीच हाय माझा, चांगला ओळखते त्याला, तो रवीच हाय." ती डोळ्यात पाणी आणून बोलत होती.

"अहो, ही खरीच वेडी आहे, भिक मागायचे सोडून काहीही बोलतीय", त्याची पत्नी.

"थांब मी तिला थोडे पैसे देवून येतो म्हणजे निघून जाईल ती", असे म्हणत तो बाहेर गेला आणि दारातूनच पाचशेच्या नोटांचे बंडल तिच्या पदरात टाकून, "हे घे आणि जा आता तोंड मिटून, झालं गेलं सगळं विसरून.", म्हणत परत आत आला.

ट्रेन सुटणार इतक्यात तिती खिडकीतून पैशांचे बंडल त्याच्या तोंडावर फेकत हसत हसत म्हणाली, "बरोबर हाय ताई, मी वेडी हाय, हा माझा रवी न्हाई, कारण त्यानं माझ्या प्रेमाची किंमत पैशात कधीच केली नसती. तो तुमचाच हाय. तुमीच सांभाळा, त्याला सुखी ठेवा आणि तुम्ही पण सुखी रहा."

इतका वेळ हसत बोलणाऱ्या तितीने त्या निघून जाणाऱ्या ट्रेनला हात केला आणि सोबत असणाऱ्या तिन्ही मुलांना घट्ट धरून रडू लागली. स्टेशनच्या एका पोल शेजारी थांबून घडत असलेले बघत भिक मागणारा, त्यांचा बाप त्या सगळयांच्या जवळ आला आणि  भिजलेल्या डोळ्यांनी तितीला घट्ट धरून म्हणाला, "पोरी अब्रू राखली हंस या गरिबीची; दावून दिलंस, गरिबी लाचार नस्ती ते. मीच नशीबवान असा, देवानं आमच्या पोटाक एक पोर दिलंन, अन तीन

अनाथ पोरं. फकस्त पोरीची कमी हुती, आता ती बी कमी न्हाय मला. चल पोरी, ह्यो तुजा बापूस जरूर तुजं लगीन लावून देईल. पैशेवाल्याशी न्हाई एका दिलवाल्याशी."

तिच्या आय-बापूस, चार भावंड आनी होणाऱ्या बाळासोबत तिती निघाली,

आपल्या झोपडीकडे,

वाट पहात, पुढच्या ट्रेनची;

ट्रेन येईस्तोवर - - - !!!

{ - - २ - - }

**तो** तोंड फिरवून विरुद्ध दिशेला बघू लागला. चोरट्या नजरेने हळूच त्याने खिडकी कडे पहिले, बराच वेळ झाला तरी ती त्या खिडकी शेजारीच थांबून होती. तो कंटाळून गेला, मधेच आपल्या पत्नीकडे पाहू लागला. यातून काहीतरी मार्ग काढायलाच हवा म्हणून तो विचार करत होता एवढ्यात,

त्याची पत्नी म्हणाली,"ए बाई, काय हवंय तुला?, तो तुझा रवी नाही माझा नवरा आहे. वेडी आहेस का तू? कोणालाही काही बोलवायला जा इथून. वेडी कुठली?"

"न्हाई ताई, तो रवीच हाय माझा, चांगला ओळखते त्याला, तो रवीच हाय." ती डोळ्यात पाणी आणून बोलत होती.

"अहो, ही खरीच वेडी आहे, भिक मागायचे सोडून काहीही बोलतीय", त्याची पत्नी.

"थांब मी तिला थोडे पैसे देवून येतो म्हणजे निघून जाईल ती", असे म्हणत तो बाहेर गेला आणि दारातूनच पाचशेच्या नोटांचे बंडल तिच्या पदरात टाकून, "हे घे आणि जा आता तोंड मिटून, झालं गेलं सगळं विसरून.", म्हणत परत आत येत होता.

त्याच्या पाठोपाठ आलेल्या पत्नीने डोळयातले अश्रू पुसत, जोरात ओरडून,

" अरविंद, काय बोलताय हे? अहो तुम्ही केलेल्या चुकीची शिक्षा जन्मभर तिला का देताय? तिचे जीवन बरबाद का करता? थोडा विचार करा." म्हणताच तो स्तब्ध झाला.

"तुमचं प्रेम प्रकरण मला सांगितले होते पण अर्धेच सांगितलेत? दोघांनाही फसवलेत, कमीत कमी पुढचा विचार तरी सरळ करा. तिची परिस्थिती तरी बघा. असे करू नका हो प्लीज." असे म्हणत ती त्याच्या सोबत खाली उतरली. आणि तिला घट्ट धरून माफी मागितली. आणि आपले स्वत:चे व तिचे दोन्ही हात त्याच्या हातात गुंफून

" आपण दोघे मिळून सांभाळू; तिला आणि तिच्या, नव्हे तुमच्या, नव्हे नव्हे आपल्या होणाऱ्या बाळाला. पण असे वाऱ्यावर सोडू नका प्लीज. " असे म्हणताच त्याने दोघींनाही घट्ट धरून माफी मागितली.

ट्रेन निघून गेली दोघांनीही एक एक सुटकेस हातात पकडून दुसऱ्या हाताने तिचा हात हातात धरून ते तिघेही चालले होते त्या झोपडीकडे,

तिथून तिच्या घरी, तिथे,

जिथे सागरा धरणी मिळते

जिथे ती त्याची वाट पहात असे !!!

****

{ - - ३ - - }

**तो** पटकन ट्रेन मधून उतरून खाली गेला आणि घडलेली सारी घटना सांगून तिला घट्ट पकडून तिची माफी मागितली. आणि एवढ्यात, हा अनपेक्षित घडलेला प्रकार पाहून त्याची पत्नी बाहेर आली आणि रागाने ओढून तिला बाजूला केले. त्याला आत घेवून गेली, आणि खिडकी बंद केली. तिती बंद खिडकी शेजारीच रडत उभी होती, तिच्या जवळच थांबलेले तिचे सवंगडी भांबावून बघत होते. काही वेळातच ट्रेन निघाली आणि तिती स्वत:ला सावरत ती ट्रेनसोबत 'रवी, माझा रवी .......' असा आक्रोश करत पळत सुटली. ती बाई आणि मुलेपण तिच्या मागे तिला बोलवत पळू लागली पण ती बेभान होवून पळत होती.

पळता पळता त्याला धडकून ती पडत असता त्या तरुणाने हातातली पिशवी सोडून तिला दोन्ही हाताला धरून सावरले, तरी ती,"रवि रवि" असे बडबडतच होती. जवळच्याच नळाकडे नेवून त्याने तिला पाणी पाजवले. तिला सांभाळलेल्या बाईने त्या चारपाच दिवसापुर्वीची घटना सांगितली. तिचे घर शोधत तिला तिच्या घरी घेवून गेला, तिचे आई आणि आजारी वडील तिचीच वाट बघत होते. त्यांना त्याने स्वत:ची ओळख करून दिली. तो रविच होता पण तिला फसवणारा नव्हे, जवळच्याच एका अनाथालयात नोकरी करणारा, स्वत:ही अनाथ असणारा.

त्या तिघांची दर्दभरी व्यथा बघून त्यांच्या घरी येणे जाणे सुरु केले. त्या अनाथ रविला आई वडिलांचे प्रेम कळू लागले. आणि एक दिवस त्याने तिला असेल तशा परीस्थितीत स्वीकारायची इच्छा व्यक्त केली, आई भाऊसहित आणि त्या तिघांच्याही निर्णयाची वाट पाहू लागला. अगदी तशीच, जशी ती वाट पहात होती, रवीची.

तीन चार दिवसांनी विचार करून ती, भाऊंना सांगून आपल्या आईसोबत निघाली. समुद्र काठावरून उगवतीच्या थंडगार वाऱ्यात, रवीची वाट पाहणे सोडून, वाट पाहणाऱ्या रवीकडे, आयुष्याची नवी पहाट घेवून होकार कळवायला - - - !!!

****

{ - - ४ - -  }

**तो** पटकन ट्रेन मधून उतरून खाली गेला आणि घडलेली सारी घटना सांगून तिला घट्ट पकडून तिची माफी मागितली. आणि एवढ्यात, घडलेला हा अनपेक्षित प्रकार पाहून त्याची पत्नी बाहेर आली आणि रागाने त्याला ओढून बाजूला केले. त्याला आत घेवून गेली, आणि खिडकी बंद केली. तिती बंद खिडकी शेजारीच रडत उभी होती, तिच्या जवळच थांबलेले तिचे सवंगडी भांबावून बघत होते. काही वेळातच ट्रेन निघाली आणि तिती स्वत:ला सावरत ती ट्रेनसोबत 'रवी, माझा रवी .......' असा आक्रोश करत पळत सुटली. ती बाई आणि मुलेपण तिच्या मागे तिला बोलवत पळू लागली पण ती बेभान होवून पळत होती.

पळता पळता त्याला धडकून ती पडत असता त्या तरुणाने हातातली सुटकेस सोडून तिला दोन्ही हाताला धरून सावरले, तरी ती बडबडतच होती. "अगं वेडे मी आहे, तुझा रवी हे बघ", असे त्या वेडीला घट्ट धरून म्हणत, जाणाऱ्या ट्रेनकडे बघत तो दुसऱ्या हाताने धन्यवादाचा निरोप देत होता.

आणि त्याची पत्नी दूर जात असलेल्या ट्रेनच्या दारातून, 'आईला दिलेल्या वचनामुळेच आपल्याला लग्न करावे लागले, पण जोपर्यंत ती वेडी माझी वाट पाहत असेल तोपर्यंत आपले नाते मित्रत्वाचे असेल', असे प्रामाणिकपणे सांगणाऱ्या सच्च्या मित्राला हात करून, 'सध्या तिला गरज आहे, ती तुझ्या सोबतीची, तुझ्या प्रेमाची' असे म्हणत भरलेल्या डोळ्यांनी हसत-हसत त्याचा निरोप घेत होती, - - -

शेवटचा आणि कायमचा !!!

**********

# <u>जीव गुंतला !!!</u>

**श**हराच्या आतून मुख्य-रस्त्याने गेलो तर ट्रॅफिक-जॅम असणार आणि खूप वाहतूक असल्यामुळे वेळ पण लागणार म्हणून आम्ही रिंग-रोडनेच जायचा विचार केला. तसा हा रिंग रोड चारपाच वर्षांपूर्वीच झाला होता. पण हा बायपास झाल्यामुळे वेळ भरपूर वाचत होता. तीन बाजूंनी मोठे रस्ते येणाऱ्या त्या शहारत घुसण्याच्या तीनेक किलोमीटर आधीच तो बायपास सुरु होतो, डाव्या बाजूला एक मोठ्ठे शहर चाळीस किलोमीटरवर. आणि उजव्या बाजूच्या बाईपासवरून गेले तर पंधरा-सोळा किलोमीटरवर दुसरे शहर. म्हणजेच तिन्ही मोठमोठ्या शहराला जाणाऱ्या बायपासच्या त्रिकोणामध्ये ते छोटस शहर वसले होते. नव्हे, त्या छोट्याशा शहराच्या भोवतीने तो त्रिकोणी बायपास तयार केला होता असे म्हणणे योग्य ठरेल.

तर डाव्या बाजूला असणाऱ्या त्या बायपासवर कार वळवून पुढे जाऊ लागलो. दोनेक किलोमीटर गेलो असेन, एवढ्यात आमच्या कारचा टायर पंक्चर झाला. कशीतरी कंट्रोल करत कार रस्त्याच्या बाजूला लावली, आणि खाली उतरलो. सोबत असणारा भाऊपण खाली आला. बघतो तर टायरमध्ये एक खिळा घुसला होता. डिक्कीमधला स्टेपनी म्हणजे स्पेअर टायर तपासला तर तो चांगला होता. टूलकिट बाहेर काढले, दोघेही मिळून चाक बदलण्याच्या कामाला लागलो.

"कॉलेज संपल्यानंतर मी पहिली नोकरी याच शहरात केली, दोन-अडीच वर्षे. इथे समोरच इंडस्ट्रियल एरिया आहे; जिथे आपण डावीकडे वळलो ना, तिथून उजवीकडे." असे माझ्यापेक्षा दोन वर्षे लहान असणाऱ्या भावाला मी चाक बदलता-बदलता सांगत होतो.

"आत्ताच एवढा निर्जन वाटतोय हा भाग, त्यावेळी तर फारच ओसाड असेल नाही?" - भाऊ.

"आत्ता निर्जन वाटतोय; रात्रीचे दहा वाजलेत ना, दिवसा तशी रहदारी असते इथे." - मी.

"मग तू त्यावेळी रहायला पण याच भागात असशील कुठेतरी?" भावाने विचारलेल्या प्रश्नाला मी उत्तर देण्यासाठी तोंड उघडणार एवढ्यात,

"काही मदत-बिदत पायजेल का?"- रस्त्याच्या दुसऱ्या बाजूला एम-एटीवर बसून, एक माणूस आम्हालाच विचारत होता. मधेच त्या एम-एटीचे अक्सिलेटर वाढवून 'घुंई-ई-ई-ई-ई-न घुंई-ई-ई-ई-ई-न' असा विनाकारण आवाज काढत उभा होता.

"नको, थँक्स. फक्त चाक तर बदलायचंय." मी नॅपकिनने तोंडावर आलेला घाम पुसत म्हणालो.

"पाना-बिना काय लागला तर सांगा, आपल्याकडं असंल टूल-किटात." असे म्हणत ती दुचाकी बंद करून स्टॅण्डवर लावत तो म्हणाला, आम्हाला मदत करण्याच्या हेतूने.

"कुठल्या जमान्यात वावरतोय हा? एम-एटी चा जमाना गेला कि आता." माझा भाऊ हळूच माझ्या कानात सांगून हसू लागला.

तर तो माणूस, "सरका बाजूला ! मी बदलून देतो ते टायर. बॅटरी-बिटरी आहे का?" असे म्हणत आमच्या जवळच आला.

जवळून गेलेल्या ट्रकच्या उजेडात त्या माणसाचा चेहरा दिसला आणि मी एकदम,

"आण्णा !", असे त्यांना ओळखून म्हणालो.

हो आण्णाच होते ते, तागडेआण्णा. म्हणजे मी त्यावेळी राहत असलेल्या घराचे घरमालक!

"ओळखलंत का मला? अहो मी संतोष, संतोष कुलकर्णी, आपल्या इथे राहायला होतो. जवळ-जवळ वीसेक वर्षांपूर्वी. वरच्या मजल्यावर जिन्यासमोरची रूम होती बघा माझी." मी जसे आठवेल तसे भर-भर सांगितले.

काही क्षण विचार करत ते म्हणाले," संतोष कुलकर्णी? निपाणीचे ना तुम्ही?"

म्हणजे आण्णांनी मला बरोबर ओळखले, म्हणून खुश होऊन मी; "हो हो आण्णा, निपाणीचा. हा माझा भाऊ समीर. आणि समीर, हे आण्णा! तू मघाशी विचारत होतास ना, मी इथे कुठे रहात होतो म्हणून, तर यांच्याच घरी रहात होतो."

आमचे बोलणे सुरु असतानाच भावाने डिकीमधले स्पेअर चाक बाहेर काढले. मी वाकून गाडीला जॅक लावला, आणि जॅकचे हॅण्डल फिरवत कारला उचलू लागलो.

इतक्यात भाऊ म्हणाला, "दादा, स्टेपनी पण पंक्चर आहे."

"क्काय? कसं शक्य आहे? मी मघाशीच बघितलं तेंव्हा तर चांगले होते चाक, फुल्ल हवा होती." - मी आश्चर्याने.

"काही तरी गफलत-बिफलत झाली असणार तुमची मघाशी बघण्यात." - तागडेआण्णा.

आता काय करायचे या विचारात असतानाच, आण्णा म्हणाले, "आता एक काम करा, ती जॅक-बीक उतरवा, चाक, पाने-बीने सारे कारमध्ये टाका, कारला लॉक-बिक करा आणि चला घराकडं, सकाळी बघू."

रात्रीचे साडे-अकरा वाजले होते. तिथून बऱ्याच अंतरावर एक चहाची टपरी होती, आणि मुख्य म्हणजे उघडी होती. आण्णा तिथे चहा प्यायला चालतच घेऊन गेले. टपरीवाल्याने दोन कप चहा दिला, आम्ही दोघांनी घेतला, पण आण्णांनी नाही.

मी आग्रह करताच ते म्हणाले, "तुम्हाला माहित आहे की, मी सूर्यास्ताआधी जेवण-बिवण उरकून घेतो, सूर्यास्तानंतर पाणी-बिणीसुद्धा पीत नाही."

मला लक्षात आले आण्णा पूर्वीपासून एकदम धार्मिक आहेत. इतकी वर्षे झाले तरी त्यांनी आपला हा नियम सोडला नव्हता, अगदी पूर्वीसारखेच होते. तीच एम-एटी, तसेच कपडे; म्हणजे फिकट निळया रंगाची त्यांच्या आवडीची सफारी आणि दिसायला सुद्धा पूर्वीसारखेच. वीस वर्षात आमचे केस विरळ झाले, टक्कल पडायला लागली, चेहऱ्यावर वय दिसू लागले होते. आण्णा मात्र किंचितही बदलले नव्हते, काळे-सावळे, सडसडीत शरीरकाठी, दाट कुरळे केस,

दोन्ही कानावर वाढलेल्या केसांचा पुंजका. राकट चेहरा, तसाच भारदस्त आवाज. हार्डवेअरच्या दुकानात काम करून मळलेली ती सफारी, बोलण्यातला साधेपणा; सगळं काही जसेच्या तसे.

“एक काम करा कारची चावी ह्याच्याकडे द्या आणि माझे नाव-बिव सांगा, सकाळपर्यंत पंचर-बींचर काढून ठेवेल तो. मी कारकडे जातो तोवर, तुम्ही चहा-बिहा पिऊन या, मी थांबतो गाडीजवळ." - असे म्हणून आण्णा कारकडे निघून गेले.

चहा पिऊन झाल्यावर; चहाचे पैसे देऊन, कारची किल्ली त्या टपरीवाल्याकडे दिली. आण्णांवर विश्वास ठेवून, त्यांची ओळख सांगून,

"रिपेअरी करून ठेवा, सकाळी कार नेण्यास येतो." असे सांगून निघालो.

"आता त्यांच्या तागडे-निवास मधेच झोपायला जात असणार तुम्ही?" असे तो टपरीवाला हसत-हसत म्हणाला.

लांबूनच "हो" असे म्हणून आम्ही निघालो.

"आता त्यांच्या घरी-बिरी जाऊन, थोडे झोप-बीप काढून, सकाळी उठून-बिठून, कार-बीर घेऊन परत जाऊया." - माझा भाऊ जाताजाता आण्णांची नक्कल करत हसत होता.

गप्पा मारत आम्ही कारजवळ पोहोचलो, तर आण्णा आमची वाट बघत थांबले होते.

"दिलात चावी त्याला?, सकाळी-सकाळी काढून ठेवील पंचर-फिन्चर. माझं नाव बोललांय ना त्याला?" - आण्णा.

"हो आण्णा, पण तुम्ही मला आहो-जाहो म्हणून काय बोलावताय, त्यावेळी प्रमाणे अरे-जारे म्हणून बोलवा ना!" - मी.

"बरोबर आहे पण तुम्ही आता मोठे-बीठे झाला ना? ठीकाय ठीकाय तुमच्या मनासारखेच बोलावतो. चला आता, घरला जाऊ, मस्तपैकी झोप-बीप घ्या आणि सकाळी उठून फ्रेश-बिश होऊन जा मग."- हसत आण्णा म्हणाले.

अण्णांची दुचाकीपण कारजवळच लावून आम्ही सर्वजण अण्णांच्या, म्हणजे मी पूर्वी भाड्याने रहात असलेल्या घरी निघालो.

तिथून बायपास रस्ता सोडून घर पाचेक मिनिटाच्या अंतरावर होते. वीस-वर्षांपूर्वी राहून गेलेले घर बघण्याची उत्सुकता मनात घेऊन मी चाललो होतो. पूर्वी मातीचा असणारा रस्ता पूर्णपणे सिमेंटचा झाला होता. ओसाड माळरानावर रस्त्याच्या अगदी एका शेवटी अण्णांचे तागडे-निवास होते. पण आता त्यांच्या घरापुढेही बरीच वस्ती झाली होती, त्यामुळे ते घर त्या वस्तीच्या मध्ये आले होते. एक मजली घरे आता बहुमजली झाली होती. पूर्वी सात-नंतर एकटे फिरण्यास भीती वाटायची पण रस्त्यावर स्ट्रीट-लाईट्स मुळे रात्री-अपरात्री कधीही फिरू शकत होतो. माझे ऑफिस तिथून चार-साडेचार किलोमीटर लांब असले तरी मी कधी चालत तर कधी सायकलने जायचो. एकूण काय त्या परिसरात न-ओळखण्यासारखा फरक पडला होता.

पूर्वी रोडपासून फारच लांब वाटणारे तागडे-निवास आता येताना खूपच लवकर आल्यासारखे वाटले. त्या परिसरात बराच बदल झाला असला तरी अण्णांचे घर मात्र जसेच्या-तसे होते, पूर्वीसारखेच. रोडवरून आत जाताच तारेचे कुंपण-गेट. गेट ओलांडून आत जाताच समोर दरवाजा, जेथे अण्णांची खोली होती. दाराच्या उजव्या बाजूने लाल जास्वदींच्या तीन-चार झाडांना पार करून गेल्यानंतर आणखी एक दार. आत जाताच मोकळा भाग जिथे पाण्यासाठी बोअर होता. तिथून सरळ गेलेकी सामोरासमोर खोल्या, जिथे बहुतेक सगळी मुलेच राहायची, बॅचलर. जिन्यावरून वर जाताच खालच्या सारख्याच खोल्या होत्या. वरच्या मजल्यावर जिन्यासमोरची मी रहात असलेली रूम आम्ही दोघेही बघून आलो, जी सध्या बंद होती.

खाली येताच अण्णांची रूम उघडली होती. रूममध्ये पूर्वीसारखाच पलंग आणि बैठक मांडलेला होता. बाहेरूनच अण्णांनी मला आणि भावाला पलंगावर झोपण्यास सांगितले, भाऊ लगेचच झोपला. पण बऱ्याच वर्षानंतर या इमारतीत आल्यामुळे असेल कदाचित, मला झोपच येत नव्हती. म्हणून आणि आण्णा दिसेनासे झाले म्हणून मी रूमच्या बाहेर आलो, बघतो तर आण्णा एकटेच पायरीवर बसले होते.

मी, "आण्णा झोपणार नाही का?" असे म्हणत त्यांच्या शेजारी जाऊन बसलो.

तर पटकन माझ्यापासून थोडेसे बाजूला सरकून आण्णा म्हणाले," काय झोपू? आज-काल झोप-बीप लागतच नाही, रात्रीची."

"पण आण्णा, रात्री असे जागरण तब्बेतीला बरे नाही. काही चिंता, काळजीतर करत नाही ना?" मी.

"तसंच म्हण पाहिजे तर." असे म्हणत आण्णा बोलू लागले. त्यांच्या बोलण्यावरून मला पूर्वी जे थोडेफार माहित होते, ते आता पूर्णपणे माहित झाले.

आण्णांचे जुने आणि वडिलार्जित छोटे घर शहराच्या मध्यवर्ती भागात आहे. तेथे आण्णा, त्यांची पत्नी, जयेंद्र-जिनेंद्र अशी दोन मुले राहतात. पण आण्णा रोज दोन-तीन तास इथे येऊन राहतात. वडिलांच्या आणि भावाच्या आजारामुळे अण्णांना सगळी शेती आणि मोठे असणारे काही घर विकावे लागले, पण त्यातून चांगले काहीच निघाले नाही. कष्ट करत-करत अण्णांनी घरापासून जवळच एक हार्डवेअरचे दुकान सुरु केले, ते जेमतेम चालत होते. पण जसे वेगवेगळे छोटे-मोठे कारखाने सुरु झाले त्यावेळेपासून दुकान बरे चालू लागले. त्यातच अण्णांनी आपल्या कष्टावर हा शहरापासून लांब प्लॉट घेतला आणि घर बांधून मुलांना भाड्याने दिला. दिसायला राकट असणाऱ्या अण्णांच्या मनमिळावू स्वभावामुळे भरपूर मुले त्यांच्याकडे भाड्याने राहायची.

इतक्या लांब असणाऱ्या घराकडे बघायला वेळ नसल्यामुळे हे घर त्यांच्या मुलांनी विकायला काढले होते. अण्णांनी त्यांना बरेच वेळा सांगून सुद्धा ते त्यांचे ऐकतच नव्हते. आणि म्हणूनच आज घर पूर्णपणे मोकळे होते, इथे कोणच रहायला नव्हते, आण्णा सोडून.

पहाटेचे तीन वाजले होते.

"मी स्वतः आणि बऱ्याच लोकांनी माझ्या मुलांना समजावून सांगितले, पण कुणाचेच ऐकत-बिकत नाहीत. आपलंच खरं म्हणतात, माझ्या कष्टाची एकमेव कमाई आहे ही. एकदा सांगून बघ कि तू पण तुझं ऐकलं-बिकलं तर, बरं होईल." असे निराशपणे अण्णा सांगत होते.

मी काही बोलायच्या आत, "झोप जा आता, रात्र संपत आलीय, मी वर झोपतोय. आणि मी सकाळी लवकर जाईन तेंव्हा कुलूप-बिलुप लावून किल्ली ह्या खिडकीत ठेव."

कुणीतरी दरवाजा वाजवल्यामुळे मी आणि भाऊ दोघेही उठलो, बघतो तर सकाळचे आठ वाजत आलेले. दरवाजासमोर आमच्या कारची किल्ली धरून एक माणूस उभा होता. "तुमची कार नीट झालीय, त्याचे बिल आणि चावी घ्या." तो दारासमोर लावलेल्या आमच्या कारकडे बोट दाखवत म्हणाला.

"स्पेअर व्हील पण नीट केलंय ना?" मी.

"ते तर ओके हाय की, हवा टच भरलेली हाय." तो.

मला काहीच कळेनासे झाले. बिलाचे पैसे घेऊन तो सोबत आलेल्या एकाच्या मोटारसायकलवर बसून निघून गेला.

जास्त विचार करायचे नाही असे ठरवून, दोघेही आवरून घराची किल्ली खिडकीत ठेवली. बोलल्याप्रमाणे अण्णा लवकर गेले होते. जाता-जाता दुकानात आण्णांना भेटून आणि त्यांची मुले पण भेटली तर त्यांच्याशी थोडे बोलता येईल असे ठरवून निघालो. दुकानात गेलो तर एक मुलगा काहीतरी काम करत उभा होता. सकाळी अजिबात गर्दी नव्हती.

तो जयेंद्रच असणार असा अंदाज बांधून मी "हॅलो, आपण जयेंद्र ना?" म्हणालो. वीस वर्षात आण्णांच्यात काही फरक पडला नसला तरी त्या मुलात बराच फरक झाला होता.

बारीक केस, आणि तुरळक दाढी वाढवलेला तीसेक वर्षाचा काळासावळा तरुण, "हो, आपण?" मी त्याला माझी संपूर्ण ओळख सांगितली.

त्याने मला ओळखले, "चेहरा काय लक्षात नाही, पण बोल काय म्हणतोस दादा?" असे म्हणून हसत तो म्हणाला आणि त्याचा भाऊ जिनेंद्र सध्या पुण्यात नोकरीला असल्याचे त्याने

सांगितले. दुकानात एकटाच असलेला बघून अण्णांचे दुःख सांगायला हीच योग्य संधी आहे असे ठरवून त्याच्याशी बोलू लागलो.

बोलता-बोलता अण्णांची रात्री झालेली भेट, त्यांनी केलेली मदत आणि त्यांचे घर न-विकण्याची ईच्छा या सगळया गोष्टी त्याला सांगितल्या, तर तो डोळे विस्फारून माझ्याकडे बघत होता. बोलायला वेळ मिळालाय म्हटल्यावर मी एका दमात त्याला सारेकाही समजावून सांगत होतो. बऱ्याच वेळानंतर तो काहीच बोलत नाही असे माझ्या लक्षात आल्यावर मी माझे बोलणे आवरते घेतले. माझे बोलणे थांबलेले बघून त्याने टेबलाच्या खणातून एक फोटो माझ्यासमोर ठेवला, अण्णांचा !!!

पण वय झालेल्या, टक्कल पडलेले, तोंडावर सुरकुत्या पडलेला तो अण्णांचा फोटो !!!

माझे डोके भणभणत असतानाच तो बोलू लागला, "दादा, चार वर्षांपूर्वीच आण्णा गेलेत, पायाला गँगरीन झाल्यामुळे दोन्ही पाय कापावे लागले त्यांचे, खर्च पेलत नव्हता म्हणून ते घर विकायला काढले. पण आण्णा कायम विरोध करायचे घर विकायला. त्यांच्या भीतीमुळे कोणीच रहात नाहीत त्या घरात. भाडेकरू पण सोडून गेलेत, काय करू तूच सांग?"

"अरे अण्णांची इच्छा नसेल तर का विकतोस? स्वतः रहा ना त्या घरात? आण्णा रात्रीच मला भेटले होते तेंव्हा बोललेत तसे." मी थरथरत पण स्वतःला सावरण्याचा प्रयत्न करत बोलत होतो. शेजारी थांबलेला भाऊपण जाम घाबरला होता.

"तुला खरंच भेटलेत का ते? आत्तापर्यंत बऱ्याच लोकांनी स्वप्नात आल्याचे सांगितले होते."
- जयेंद्र.

"हो रे, खरं तर त्यांना भेटून थॅन्क्स म्हणायला आलो होतो दोघेही, रात्री त्यांनी केलेल्या मदतीबद्दल. पण दुकानात आल्यावर वेगळेच झालं. रात्री त्यांनी त्यांच्या खोलीचा दरवाजा उघडून दिला, कार रिपेअर करण्यास मदत केली." भाऊ स्वतःला सावरत बोलत होता. अण्णांची दुचाकी यापूर्वी कधीही बघितलेला नसूनसुद्धा दुचाकींचा नंबर भावाने सांगितला.

जयेंद्र माझ्या गळयात पडून रडत बोलू लागला. "जिनेंद्रला गेल्या वर्षांपासून नोकरी लागल्यानंतर परिस्थिती थोडी सुधारलीय आमची. बऱ्याच लोकांनी मला घर विकण्यासाठी विरोध केला पण पटतच नव्हते. पण, पण तुला वचन देतो, नाही विकणार ते घर." आण्णांच्या फोटोकडे बघणाऱ्या माझ्या डोळयातून पण नकळत अश्रू वाहू लागले.

माझी झालेली अवस्था बघून भावाने कारची किल्ली घेतली आणि कार चालवू लागला, आणि एकमेकांशी काहीही न-बोलता आम्ही निघालो. रात्रीचा विश्वास न-ठेवण्यासारखा तो प्रसंग डोळयासमोरून हलतच नव्हता.

******

त्यानंतर बरेचवेळा मला त्या रस्त्यावरून जायचा प्रसंग आलाय आणि आजही येतोय, त्या जागेवर येताच त्या टपरी समोर उभे असलेले आण्णा दिसतात,

कुणालाही नाही पण फक्त मलाच दिसतात.

हसत हात करणारे आण्णा !

मी पण त्यांना हात करून जातो, नेहमीच !!!

§§§§§§

# ई साहित्य प्रतिष्ठान

ई साहित्य प्रतिष्ठान मराठी साक्षरांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी आणि लेखक व कवींना एक सशक्त व्यासपीठ मिळावे या दुहेरी हेतूने स्थापन झाले. मराठीत एक जबरदस्त वाचन संस्कृती निर्माण व्हावी, तरुणांनी भरपूर वाचन करावे, ग्रामीण भागातील तरुणांना मोबाईलवर पुस्तके उपलब्ध व्हावीत, परदेशस्थ मराठी वाचकांना सहजासहजी इंटरनेटवर पुस्तके मिळावीत हे आमचे स्वप्न. जगातील चाळीस देशांतील  सुमारे साडेतीन लाख वाचक या चळवळीचे सभासद आहेत.  त्याशिवाय वर्षाला सुमारे तीस ते चाळीसलाख वाचक वेबसाईटवरून पुस्तके डाऊनलोड करतात.

पण आम्ही याने समाधानी नाही. १२ कोटी लोक मराठी बोलतात. त्यातले किमान सहा कोटी वाचक व्हावेत हे आमचे लक्ष्य आहे. आणि आमची ही इच्छा जर योग्य असेल तर कायनात वगैरे सोडा, आमचे वाचक तरी त्याच्यासाठी काही करतील ही अपेक्षा आहे.

आमच्या वाचकांना एकच विनंती. आपल्या ओळखीच्या किमान दहा साक्षरांचे ई मेल पत्ते आम्हाला पाठवा. अशा रितीने आपण तीनाचे तीस आणि तिसाचे तिनशे होऊ. या मराठीचिये नगरी ब्रह्मविद्येचा सुकाळू व्हायला वेळ नाही लागणार. सर्वांची साथ असेल तर.

एवढी विनंती मान्य कराच.

ई मेल पत्ते esahity@gmail. com या पत्त्यावर पाठवा बरं!